22 September 2026 page 02_Layout 1 21-09-2026 05:49 PM Page 1



“ जीवनातील प्रत्येक क्षण हा एक अनमोल रत्न आहे; तो जपून ठेवा. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## बहुजन सौरभ संपादकीय

# आणखी किती साहिलच्या आत्महत्या होऊ द्यायच्या?

आयआयटीची प्रतिष्ठा मोठी की विद्यार्थ्याचा जीव? आयआयटी म्हणजे देशातील गुणवत्तेचे सर्वोच्च शिखर मानले जाते. येथे प्रवेश मिळविण्यासाठी लाखो विद्यार्थी स्पर्धा करतात. पालकांची स्वप्ने, विद्यार्थ्यांची वर्षानुवर्षांची मेहनत आणि भविष्यातील असंख्य शक्यता या प्रवेशामागे असतात. पण याच प्रतिष्ठित संस्थेच्या परिसरात एखाद्या विद्यार्थ्याचा मृत्यू होतो आणि त्यानंतर जातीय भेदभाव, मानसिक छळ, परीक्षा आणि संस्थात्मक संवेदनशीलतेचे प्रश्न उपस्थित होतात, तेव्हा प्रश्न केवळ एका विद्यार्थ्याच्या मृत्यूचा राहत नाही. तो संपूर्ण शिक्षणव्यवस्थेच्या आत्मपरीक्षणाचा प्रश्न बनतो. आयआयटी मुंबईतील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या मृत्यूने हेच अस्वस्थ करणारे प्रश्न पुन्हा समोर आणले आहेत. १८ सप्टेंबर रोजी परीक्षा सुरू असताना मोबाईल आणि ChatGPTचा वापर केल्याचा आरोप त्याच्यावर झाला. संस्थेच्या म्हणण्यानुसार त्याच्याशी समुपदेशन करण्यात आले होते आणि त्याच्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली नव्हती. मात्र, त्याच्या कुटुंबीयांनी प्राध्यापकांकडून जातीय अपमान आणि मानसिक छळ झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदी लागू केल्या आहेत. तपास गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. येथे एक गोष्ट स्पष्ट असली पाहिजे - एफआयआर म्हणजे दोषसिद्धी नाही आणि संस्थेचे स्पष्टीकरण म्हणजे निर्दोषत्वाचाही अंतिम पुरावा नाही. सत्य तपासातूनच समोर आले पाहिजे. परीक्षा हॉलमध्ये नेमके काय घडले? कोणत्या शब्दांत विद्यार्थ्याशी संवाद झाला? त्याच्याशी पूर्वी कधी भेदभाव झाला होता का? त्याने कोणाकडे तक्रार केली होती का? संस्थेच्या तक्रार निवारण यंत्रणेने त्याची दखल घेतली होती का? सीसीटीव्ही, डिजिटल पुरावे, साक्षीदार, ई-मेल, संदेश आणि उपलब्ध संस्थात्मक नोंदी यांची निष्पक्ष तपासणी झाली पाहिजे. कारण एका बाजूचा दावा ऐकून न्याय होत नाही आणि दुसऱ्या बाजूचा बचाव स्वीकारूनही सत्य सापडत नाही. पण या घटनेने उपस्थित केलेला ‘जात कुठे संपली आहे?’ हा प्रश्न मात्र तपासाच्या निकालाची वाट पाहत बसू शकत नाही. चंद्रावर पोहोचलेल्या भारतात आपण कृत्रिम बुद्धिमत्तेची भाषा बोलतो, जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञान निर्माण करतो; पण एखाद्या विद्यार्थ्याला त्याची जात आठवण करून देण्याची मानसिकता जर अजूनही अस्तित्वात असेल, तर आपल्या आधुनिकतेला मोठीच तडा गेलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला केवळ नोकरी मिळविण्याचे साधन मानले नाही. शिक्षण हे माणसाला स्वाभिमान, समानता आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देणारे साधन आहे. मग शिक्षणाच्या सर्वोच्च संस्थेतच विद्यार्थ्याला त्याच्या सामाजिक पार्श्वभूमीमुळे कमीपणा जाणवत असेल, तर आपण डॉ. बाबासाहेबांच्या भारताचे स्वप्न कुठे नेऊन ठेवले? आरक्षणाबाबत आजही समाजात अनेक गैरसमज आहेत. आरक्षण ही दया नाही, उपकार नाही; ते सामाजिक आणि ऐतिहासिक विषमतेवर संविधानाने दिलेले न्यायाचे साधन आहे. एखाद्या विद्यार्थ्याला ‘तू आरक्षणामुळे आला आहेस’, ‘तुझी गुणवत्ता कमी आहे’ अशा स्वरूपाची टोचणी देणे हे केवळ शब्द नसतात. अशा शब्दांत एखाद्या विद्यार्थ्याच्या आत्मसन्मानावर प्रहार दडलेला असू शकतो. म्हणूनच शैक्षणिक संस्थांमध्ये संविधानिक मूल्यांचे शिक्षण विद्यार्थ्यांपुरते नव्हे, तर शिक्षक आणि प्रशासनासाठीही आवश्यक आहे. सरकारी आकडेवारीनुसार २०१८ ते २०२३ या कालावधीत आयआयटीमध्ये ३९ विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची नोंद झाली होती. त्याच काळात केंद्रीय उच्च शिक्षण संस्थांमध्ये आत्महत्यांच्या घटना मोठ्या प्रमाणावर नोंदल्या गेल्या. म्हणजे प्रश्न एका साहिलपुरता मर्यादित नाही. प्रश्न आहे आपल्या शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्याला माणूस म्हणून किती जागा आहे? गुण कमी पडले तर समुपदेशन हवे. नियम मोडला असेल तर नियमानुसार कारवाई होऊ शकते. परीक्षा गैरप्रकार झाला असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. पण प्रत्येक शिस्तभंगाची प्रक्रिया मानवी सन्मान जपणारी असली पाहिजे. शिक्षा ही सुधारण्यासाठी असते; विद्यार्थ्याला संपवण्यासाठी नव्हे. आयआयटीसारख्या संस्थांमध्ये स्वतंत्र आणि विश्वासार्ह जातीय भेदभावविरोधी तक्रार यंत्रणा, प्रभावी समुपदेशन, पारदर्शक शिस्तभंग प्रक्रिया, शिक्षकांसाठी आचारसंहिता आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी तक्रार केली तर ‘प्रतिष्ठेला धक्का बसेल’ या भीतीने ती दडपण्याची वृत्ती कोणत्याही संस्थेला परवडणारी नाही. साहिलच्या प्रकरणात दोष कोणाचा आहे, हे तपास आणि न्यायालय ठरवतील. परंतु या घटनेनंतर संस्थांनी स्वतःला एक प्रश्न नक्की विचारला पाहिजे, आपल्या कॅम्पसमध्ये विद्यार्थी घाबरून जगतोय की सन्मानाने? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला. त्यामुळे आयआयटीची खरी प्रतिष्ठा तिच्या रँकिंगमध्ये, प्रयोगशाळांमध्ये किंवा जागतिक क्रमवारीत नाही. तिची खरी प्रतिष्ठा अशी आहे की तिथे गरीब घरातून आलेला विद्यार्थी असो, आरक्षणातून आलेला असो किंवा कोणत्याही सामाजिक पार्श्वभूमीचा असो, त्याला आपली जात लपवून नव्हे, आपली गुणवत्ता आणि माणूसपण घेऊन जगता आले पाहिजे. साहिलला आपण परत आणू शकत नाही. पण पुढचा साहिल वाचवू शकतो. त्यासाठी प्रश्न विचारावे लागतील. व्यवस्था तपासावी लागेल. पूर्वग्रहांना आव्हान द्यावे लागेल. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शिक्षणसंस्थेला पुन्हा एकदा सांगावे लागेल, विद्यार्थी हा आधी माणूस आहे; नंतर परीक्षार्थी. आणखी एका साहिलच्या मृत्यूनंतर जागे होण्याची वाट पाहायची की आजच जागे व्हायचे, हा निर्णय आता समाजाने आणि शिक्षणव्यवस्थेने घ्यायचा आहे.●●

# नाशिकच्या कारंजा चौकातील अनोळखी ‘जयभीम’ची माणसे आणि वीर मेघमाया

**रविवारचा दिवस. नाशिकचा कारंजा चौक, नेहमीप्रमाणेच प्रचंड वर्दळ आणि गर्दी. प्रत्येक जण आपापल्या कामाच्या घाईत होता. अशाच वेळी एका मोठ्या फ्लेक्सने माझे लक्ष वेधून घेतले. फ्लेक्सवर वीर मेघमाया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची छायाचित्रे होती. “जय वीर मेघमाया” आणि “जय भीम” अशा घोषणा परिसरात ऐकू येत होत्या.**

मनात सहज प्रश्न निर्माण झाला, हे कोण लोक आहेत? वीर मेघमाया कोण आहेत? आणि नाशिकच्या मध्यवर्ती कारंजा चौकात त्यांचा उत्सव कोण साजरा करीत आहे? मी विचार करीत असतानाच दांडगी शरीरयष्टी असलेले सुमारे २०-२५ कार्यकर्ते घोषणाबाजी करीत तेथून पुढे निघून गेले. “डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय!” “वीर मेघमाया की जय!” कार्यकर्ते अनोळखी होते; पण त्यांच्या घोषणांमधील ‘जय भीम’ अगदी ओळखीचा होता.

**मग वीर मेघमाया कोण होते?**

भारत सरकारच्या डाक विभागाने प्रकाशित केलेल्या अधिकृत विवरणिकेनुसार, वीर मेघमाया हे सुमारे एक हजार वर्षांपूर्वीचे पश्चिम भारतातील संत म्हणून स्मरणात आहेत. त्यांचा जन्म गुजरातमधील ढोलका परिसरातील रनोडा गावातील दलित विणकर कुटुंबात झाल्याचे त्या विवरणिकेत नमूद आहे. त्या काळात गुजरातमध्ये भीषण दुष्काळ पडला होता. पाटणच्या राजा सिद्धराज जयसिंह यांच्या काळात सहस्रलिंग सरोवर बांधण्यात आले. परंतु सरोवरात पाणी येत नव्हते. त्या संदर्भातील तत्कालीन धार्मिक कथेनुसार, ३२ गुण असलेल्या व्यक्तीच्या बलिदानाने पाण्याचा प्रश्न सुटेल अशी समजूत होती. मेघमाया हे अशी व्यक्ती असल्याचे कथन आहे. परंतु या कथेमधील महत्त्वाचा सामाजिक संदर्भ असा आहे की, मेघमायांनी आपल्या बलिदानाच्या आधी दलित व वंचित लोकांच्या सामाजिक सन्मानासाठी मागणी केली आणि ती स्वीकारली गेल्याचे भारत सरकारच्या विवरणिकेत नमूद आहे. त्यामुळे त्यांचे स्मरण सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि वंचितांच्या हक्कांशी जोडले जाते.




विशेष म्हणजे भारत सरकारच्या डाक विभागाने ३१ डिसेंबर २०२४ रोजी वीर मेघमाया यांच्या सन्मानार्थ ५ मूल्याचे स्मारक टपाल तिकीट जारी केले.

**‘जय मेघमाया’ आणि ‘जय भीम’ एकत्र का?**

कारंजा चौकातील त्या फ्लेक्सवर वीर मेघमाया यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे छायाचित्र दिसत होते. या दोन ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमध्ये थेट ऐतिहासिक संबंध असल्याचा निष्कर्ष केवळ त्या फ्लेक्सवरून काढता येणार नाही. मात्र सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष, वंचितांच्या मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आणि समतेची आकांक्षा या व्यापक सामाजिक संदर्भातून आयोजकांनी दोन्ही स्मरणपरंपरा एकत्र मांडल्या असाव्यात. मी त्या कार्यकर्त्यांना ओळखत नव्हतो. त्यांची संघटना कोणती, त्यांची नावे कोणती, याची माहितीही त्याक्षणी मिळाली नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल अंदाज बांधणे योग्य ठरणार नाही. पण त्यांच्या घोषणांनी एक विचार मात्र मनात निर्माण केला - इतिहासातील विस्मृतीत गेलेल्या व्यक्तिमत्त्वांना नव्या पिढीसमोर आणणे ही देखील सामाजिक जागृतीची एक प्रक्रिया आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, वीर मेघमाया आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर - या सर्वांच्या कार्याचा इतिहास वेगवेगळ्या काळातील आणि वेगवेगळ्या संदर्भातील आहे. मात्र आजच्या समाजाने त्यांच्या विचारांकडे समता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून पाहणे महत्त्वाचे आहे. कारंजा चौकातील तो प्रसंग काही मिनिटांचाच होता.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

कार्यकर्ते घोषणा देत पुढे निघून गेले. गर्दी पुन्हा नेहमीसारखी झाली. परंतु माझ्या मनात मात्र त्यांचा जयघोष बराच वेळ घुमत राहिला.

**“अनोळखी होते ते चेहरे;** पण त्यांच्या ओठांवरील ‘जय भीम’ अगदी ओळखीचा होता!” आणि त्याच दिवशी मला वीर मेघमाया या इतिहासातील एका महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वाची नव्याने ओळख झाली. मेघवाल समाज त्यांची जयंती दरवर्षी साजरी करतो असे कळले. वीर मेघमाया जयंती निमित्ताने सर्वांना शुभेच्छा!●●

## सहावे स्मृतीदिन

# “भाऊंची आठवण”

**भाऊंचे जाणे तेव्हाही अखरले होते. आजही अखरते. क्वचित एखादाच भाऊ होऊ शकतोय. भाऊ लोखंडे होते तसेच! स्मरणीय .. अविस्मरणीय ..!**

जीवन जर सामाजिकतेचे क्रमशः पृष्ठ असेल तर ते वाचावेच लागेल. भाऊ लोखडे हे लक्षवेधी असे स्वर्णिम पृष्ठ होते. वेधक, उद्बोधक अन् भेदक सुद्धा! कोवीड काळात 22 सप्टेबर 2020 ला त्याचे निधन झाले. सहा वर्षे होऊन गेली. ती फार मोठी सामाजिक हानी होती. ती आजही आहे. भाऊ, वक्तृत्वाचे बेताज बादशहा होते. सभागृह असो की जगी मैदान. भाऊचे नाणे खणाणत असे. त्याची प्रसगावधानतेवर प्रचड पकड होती. ते हुकमी बोलत. त्याच्यासारखे तेच. जगण्यातही. असण्यातही. कलप केलेले केस. भडक रगाची रगसगती. टापदार. डौलदार. चारचौघात आले की नजरा खेचून घ्यायचे. त्याची भैय्या म्हणण्याची शैली, अवीट होती. ते आवडते होते. तितकेच नावडते! चविष्ट होते, तितकेच तिखटही! या अशा दोन्ही बाजू भाऊच्या प्रबळ होत्या. त्याची सपादित गुणवत्ता उत्तुग होती. वाचन अफाट होते. शिवाय चौफेर. त्याची तुलना कुणाशी करावी? कुणी दिसत नसे. या अनुत्तरतेतच त्याची महत्ता असायची. पाली भाषेचे विद्वान प्राध्यापक म्हणून त्याची ओळख होती. देशभर त्याची गणना व्हायची. ‘निकाय’ नावाचे सुदर मासिक त्यानी काढले होते. त्या मासिकाचे ते सपादक होते. त्यानी पुस्तके व इतर असे प्रचड लेखन केले. त्याच्या सवाद सामर्थ्याने दोन पिढ्या घडल्या. हजारो लोक त्याना ऐकायला अधीर असत. ते केवळ ऐकणे नसे. आबेडकर-बुद्ध जगणे असे. सवादावर भाऊची विलक्षण हुकूमत होती. ते सवादाला अशा वळणावर आणत की, उर्दू शेर चपखल बसे. तात्काळ टाळ्याचा वर्षाव होई. ते मराठीत बोलत. ते हिन्दीत बोलत. ते इग्रजीत बोलत. लिहायची त्याची धारही वक्तृत्वासारखी धाराप्रवाही असे. त्याच्यासोबतचा प्रवास खमग व्हायचा. हसायला कोणताच कोपरा सुटत नसे. प्रसगाचा, घटनाचा धबधबा कोसळे. खूप खूप सागायचे. सगतीत खूप लहान होऊन जायचे. ते उत्तम खवैये होतेच! ते निमित्त शोधत असत. घरी येऊन काहीतरी देणे भाऊना आवडे. कधी त्याच्या घरच्या झाडाची फळे असायची. कधी एखादी भेटवस्तू. ती त्याची खास खासियत होती. अखेर अखेर ते खिन्नतेत रमत. त्यातही इतिहास असे. तोही ऐकावासा वाटायचा. भाऊच्या जगण्याला अर्थ होता. वेगळेपण होते. सदर्भासह सदर्भ होता. ते जेव्हढे दिसले त्यापेक्षा कितीतरी मोठे होते. त्याची सदोदित आठवण राहील. भाऊना स्मरणासह नमन!●●






रणजित मेश्राम
स्मृतीशेष

# प्रा. डॉ. भाऊ लोखडे बहुआयामी व्यक्तीमत्व




प्रा. डॉ. भाऊ लोखडे हे विद्या व्यासगी वादविवाद पटू आबेडकरी निष्ठ चळवळे. अन्याय अत्याचाराच्या विरोधात पेटून उठणारे होते. प्राचार्य ओमप्रकाश नाहाटा याचा त्याच्या टेबलावर खून झाला. त्याला वाचा फोडण्यासाठी नागपूरात विद्यार्थी याचा मोर्चा काढून त्या घटनेचा निषेध केला. न्याय देण्याची मागणी केली. त्यावेळी केलेले जोशपूर्ण भाषण तरूणाचे रक्त खवळणारे होते. त्यानी आपल्या नेतृत्व गुणाची चुणूक दाखविली. कोणत्याही विषयावर अभ्यासपूर्ण भाषण करीत असत सभेत श्रोत्याचे टाळ्या भरपूर घेऊन व्याख्यानात रग भरत असत. आपला विषय मुद्देसुद माडून सभा जिकत असत. त्याच्या भाषणात शेरोशायरीची रेलचेल असे. अनेक पुस्तकाचे लेखक उत्तम शिक्षक, पाली, प्राकृत, हिदी, इग्रजी व सस्कृत भाषेवर प्रभूत्व होते. ते कवी होते. उत्कृष्ट सपादक होते. निकाय मासिकाचे सपादन करून दर्जेदार साहित्याची निर्मिती केली. ते बौद्ध धर्माचे गाडे विद्वान होते. बौद्ध धर्म ग्रथाचे लेखन केले आहे. पाली साहित्याचे मराठीत भाषातर करून मराठी वाचकाची सोय केली. मनमिळाऊ स्वभाव. त्यामुळे मैत्री सवार्सोबत असे. कोणावर रागावले असले तरी काही वेळानी त्याच्यासोबत प्रेमाने चर्चा करीत असत. कोणासोबत शत्रुत्व करीत नसत. त्यामुळे सवार्चे आवडते होते. भाऊ आपणा सवार्ना सोडून गेले 22 सप्टेबर2020 ला निसर्गलीन झाले. त्याना विनम्र अभिवादन!●●



विनायकराव जामगडे
मो.9372456389

# सत्ता व सत्तेच्या घटकांचे भागीदार

प्रतिक, प्रतिमा, प्रतिमान विषमतावादी, मनुवादी शत्रू पक्षांचे दैवत मानून, समजून पुजाल, मानाल आणि न्यायाची अपेक्षा त्यांच्या सत्ताधारी आणि सत्तेकडून कराल? हे कसे व कितपत बरोबर व योग्य आहे? हे तर सत्तेत असलेल्या शत्रुंचे विरोधकांना मापण्याचे राजनितिक मापदंड असतात. राज्याभिषेक असो कि नागरिकत्व हे शत्रू पक्ष हे आपल्या शत्रुंना का बरे बहाल करतील? उगाच नव्हे सत्तेतील विषमतावातदी मानसिकता शहरांचे व गांवाचे नामांतर करीत सुटलेले आहेत. कारण शहरांची व गावांची नावे ही लोकांची धारणा ही प्रतिके, प्रतिमा व प्रतिमान यांच्या माध्यमातून घडवित असतात व सत्तार्थी लोकांचे हे मानसिक, भावनिक व सामाजिक कामच असते. उगाच नव्हे बल्लारशाहचे बल्लारपूर, चांद्याचे चंद्रपर, औरंगाबादचे छ.संभाजी नगर, अहमदनगरचे अहिल्यानगर, इस्लामपुरचे ईश्वरनगर, उस्मनाबादचे धाराशिव व अलाहाबादचे प्रयागराज झाले. उगाच नव्हे यज्ञात व अभिषेकात पौष्टिक व जीवनावश्यक वस्तुंची आहुती देऊन त्यापासून बहुजनांना वंचीत करण्यात येत असते. राजकारणांत लोकशाही ही भ्रामक संकल्पना आहे व समाजवाद ही बनवेगीरीची संकल्पना, या सत्तेला जनसमर्थन मिळवून देणाऱ्या लालच आहे. सत्तेतील लंगडी गाय व जनतारूपी वासरांना भ्रामक कथा सांगून व रचून त्यात रंगवून व गुंतवून ठेवत असते व सत्तेचा असली मलिदा ही सत्ताधारी लंगडी गाय फस्त करीत असते. जनतारूपी वासर ही या सत्तारूपी लंगड्या गायीच्या अस्सल कुड्या असतात व तोच त्यांचा खरा आधार व शस्त्र असतात. निव्वळ अंधभक्त म्हणून हिणविल्याने ही समस्या सुटत नसते. कारण मुळात ही समस्या नसून ते या आधारशीला असलेल्या बहुसंख्य बहुजनांचे सर्व प्रकारचे समाधान त्यात निहित असते. म्हणून ज्या लोकांना प्रतिके, प्रतिमा, प्रतिमान हे लोकांच्या मानसिकतेत रूजविता येते तेच लोक सत्तेत असतात व कोणताही धर्म हे या अशा लोकांचे सुलभ व सहज उपलब्ध असलेले प्रभावी माध्यम आहे, जे नसलेला ईश्वर व कसलेल्या पुरोहित यांच्या माध्यमातून सतत सक्रिय व क्रियाशील असतो. म्हणून जगातील बहुतांश सत्ताधारी हे पुरोहित वर्गातीलच आहेत. तसेच बहुतांश तत्त्वज्ञ ही याच वर्गातून आहेत. कारण त्यांना विनाकष्ट व विनायसे सारे पौष्टिक अन्न, निवास व सुखसोयी या आपोआप विनाप्रयास मिळत असतात. धर्मांचे उत्सव व सण हे त्यांचे सहज, सुलभ व सर्वोत्तम माध्यमे आहेत. भ.गीतेच्या ३ऱ्या अध्यायात या कुटनीतीचे व गुप्ततेचे रहस्य मांडलेले आहे; ज्यात म्हटले आहे कि ‘कोणत्याही प्राण्याची क्षमता ही त्याला मिळणाऱ्या अन्नावर त्याची उत्कृष्टता व दर्जा ही निर्धारित असते. जसे अन्न तशी क्षमता. अन्न म्हणजे निवळ जेवण व आहार नव्हेतर अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, प्रवास, प्रर्यटन व संधी हे घटक यात समाविष्ट आहेत. सत्तेत असणे म्हणजे या घटकांवर ज्यांचे अधिराज्य व अधिनियम चालते असा सत्ताधारी गट, जे कळत न कळत त्या त्या देशातील राज्यघटनेच्या माध्यमातून त्याची अमंलबजावणी केली जाते. संविधानाचे गोडवे गात मनुस्मृती राबविणे यालाच कुटनीती मानल्या जाते. असे सर्वत्र जगात सद्या सुरू आहे. सत्तेचा प्रमुख हा मुखवटा असतो. असली सत्ता ही या मुखवट्याल्या जे लोक घेरून ठेवतात त्यांच्या मुठीत असते. सत्ता म्हणजे ही अशी असंख्य लोकांची निर्ढावलेली व कसलेली फौलादी मूठ, जी सहजासहजी उघडता येत नाही. परिवर्तन म्हणजे ही सद्या अस्तित्वात असलेली कसलेली मूठ उघडून आपली मजबूत मूठ कसणे. हे ज्यांना शक्य आहे, ते अस्सल राजकारणी व ज्यांना ते शक्य नाही ते वाहक असलेले खोकेधारी; मग सत्तेतील कोणतेही क्षेत्र घ्या संसद, प्रशासन न्यायपालिका व प्रचार-प्रसार माध्यमे (ज्यात प्रामुख्याने धर्माचा व त्याच्या माध्यमांचा समावेश जादा असतो). सत्ता ही प्रतिके, प्रतिमा व प्रतिमान निर्माण करीत असते व ही क्षमता ज्यांच्या प्रतिभेत असते ते लोक सत्तेत व सत्तेच्या घटकांचे भागीदार असतात.●●






विनोद उलीपवार
मो.9370138078

# जगात, अशक्य काय आहे?

**आज मी सिंहासारखा माझ्या मागील जीवनाकडे वळून बघतो आणि माझ्या आयुष्यातील घटना एखाद्या चित्रपटासारख्या माझ्या डोळयासमोर येतात. मला आठवतोय, माझ्या जीवनातील तो संघर्ष! ती धडपड! खरेच! आपले जीवन, आपला जीवन प्रवास हा एक संघर्षच आहे. जीवनाच्या प्रवासात अशा काही घटना घडतात की, ज्यामुळे जीवनाची वाटच बदलून जाते. त्यातूनच आपण घडू लागतो. आपल्या जीवनाला नवी ऊर्जा मिळून आपले घडणे सार्थक ठरते. आज जी मी आहे अर्थात घडलो आहे. त्या घडण्यामागील दोन-तीन घटनांचा हा मागोवा!**

**चिंतनाचा आणि परिवर्तनाचा दिवस :** आजचा दिवस माझ्या जीवनातील अतिशय वेगळा दिवस होता. आज जेव्हा या घटनेचा विचार करतो. तेव्हा असे वाटते की, मी दहावीत नापास होणे हे माझ्यासाठी लाभदायक ठरले! ती घटना जीवनाला कलाटणी देणारी होती. तो दिवस माझ्या आयुष्यातील अतिशय महत्वाचा दिवस ठरला होता.

घरी आई- वडिलांना मी नापास झाल्याचे कळले. परंतु वडील रागावले नाही. ते म्हणाले, “आता नीट अभ्यास कर!”

मी खाली पाहत, “होय” म्हणालो.

“आता चाचाजी काय म्हणतील? ते तुला आश्रममध्ये ठेवतील काय?” वडिलांनी विचारले.

“माहीत नाही. पण चाचाजी मला एक संधी देतील, असे वाटते.” मी म्हणालो.

“बघ, ते काय म्हणतात?” वडील म्हणाले. त्यावर मी माननेच होकार दिला.

रात्री जेवण करून मी आश्रमातील खोलीत आलो. आज ती खोली भकास वाटत होती. या खोलीमध्ये राहायला येऊन ९ महीने झाले होते. परंतु माझ्या अभ्यासात विशेष प्रगती झाली नव्हती. याची आजच प्रचिती आली होती. दहावीच्या परीक्षेत मी नापास झालो होतो. मी जीवनात काहीच करु शकणार नाही का? याचा विचार करू लागलो. माझे अंतःमन सांगत होते की, प्रदीप, गांधी आश्रममधील तुझ्या खोलीत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो तू लावलास ना! कशासाठी? हे फोटो म्हणजे शोभेच्या वस्तु आहेत का? नाही ना? जीवनात काहीच अशक्य नाही. अशक्य असलेली गोष्ट शक्य करून दाखविण्याची जिद्द जर असेल, तर काहीच अशक्य नाही. इतक्या लवकर तू नेपोलियन विसरलास काय? आता केवळ परीक्षेचाच नाहीतर जीवनाचा अभ्यास करायचा आहे. तू आता बदलला पाहिजे. अरे, तुला खूप शिकायचे आहे ना? डॉ. बाबासाहेब आंबेडकर तुझा आदर्श आहे ना? तू त्यांचा आदर्श गिरविणार की नाही? तू खूप खूप शिक्षण घेतलेच पाहिजे. आता तू निर्धार केलाच पाहिजेच. चल उठ! झोपू नकोस! तर दुसरा विचार मनात येत होता की, प्रदीप तू दहावी पास करू शकला नाही? पुढे काय शिकणार? तू काहीच करू शकणार नाहीस. ग्रंथालयात काम करणे अन ब्रेड विकणे हेच तुझे काम आहे. बस्स! तू काहीच करू शकणार नाही.. मी गांगरलो. काय करायचे? अन् क्षणातच मी ठरवले. माझा निर्धार पक्का झाला. आता आपण जागृत व्हायचे! कितीही कठीण परिस्थिती आली, तरीही घाबरायचे नाही. खूप प्रयत्न करायचे आणि यश खेचून आणायचे! हाच आपला सम्यक संकल्प! काहीही झाले तरी मागे वळायचे नाही. असा विचार करीत असताना कधी मला झोप आली ते कळलेच नाही. पहाटे उठलो. प्रातर्विधी आटोपून मी ब्रेड विकण्यासाठी बाहेर पडलो. आज मात्र मी कालचा प्रदीप राहिलो नव्हतो. याची जाणीव मला झाली. मी आता बदललो. कालही ब्रेड विकत होतो. आजही ब्रेड विकत आहे. मग काय बदलले! मी कालचाच होतो. हे सत्य आहे. पण, खरचं मी आज बदललो होतो. कारण माझे विचार बदलले होते. जीवनाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोण बदलला होता. आता मी सकारात्मक विचार करु लागलो होतो. आता ग्रंथालयातील वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके आणि पुस्तके वाचण्याचा सपाटा मी सुरू केले. आता मी केवळ वाचन करीत नव्हतो; तर ते समजून घेऊन विचार करू लागलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र वाचले. त्यांचे चरित्र वाचल्यानंतर मला खूप ऊर्जा मिळाली. जगात काहीच अशक्य नाही, याचा विचार सतत डोक्यात घोळत होता. अलीकडे माझा स्वविश्वास भलताच वाढला होता. आता पूर्वीसारखा मी राहिलो नव्हतो. बोलण्यात-वागण्यात विशेष परिवर्तन झाले होते. आता मी लोकांना केवळ बघत नव्हतो, तर त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करीत होता. आता मला लोकांचे चेहरे वाचता येऊ लागले होते.. अनेक लोकांशी माझा संबंध आल्यामुळे मी इतरांकडून शिकण्याचा प्रयत्न करीत होतो. मी विचार करायचा की, प्रत्येक व्यक्तीकडून खूप काही शिकता येते. त्यांच्याकडून कोणती चांगली गोष्ट शिकता येईल याचा मात्र विचार करता आला पाहिजे. ग्रंथालयात काम करीत दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालो. १९७६ च्या जुलै महिन्याच्या सुरुवातीला वर्धा येथील यशवंत महाविद्यालयात अकराव्या वर्गात मी प्रवेश घेतला. आता पूर्वीसारखा मी ‘ढ’ विद्यार्थी राहिलो नव्हतो. माझे जनरल नॉलेज देखील उत्तम होते. आता अभ्यासात मी विशेष रुची घेऊ लागलो होतो. अकरावीत शिकत असताना मी लेख, कथा आणि कविता लिहू लागलो होतो. लिहिलेली कथा आणि लेख ग्रंथालयात काम करणाऱ्या मित्रांना आणि वर्गातील मित्रांना वाचून दाखवायचा. बारावीत वर्गात असताना ‘दोन जादूगार मित्र’ ही माझी पहिली कथा वर्ध्याच्या ‘विधाता’ या दैनिकात १८ जुलै १९७७ रोजी प्रसिद्ध झाली. वडिलांना ‘विधाता’ पेपरमध्ये छापून आलेली माझी कथा दाखविली. त्यांना खूप आनंद झाला. ते लिहिण्यासाठी मला सतत प्रोत्साहन देऊ लागले. त्यानंतर अनेक लेख, कथा आणि कविता ‘विधाता’ आणि ‘प्रतापगडचे वारे’ या दैनिकात प्रकाशित झालेत. ‘विधाता’ आणि ‘प्रतापगडचे वारे’ या दैनिकांच्या दिवाळी अंकात कथा प्रकाशित झाल्यात. मी वेगवेगळ्या सामाजिक विषयावर आपले विचार लिहून लोकमत, तरुण भारत आणि नागपूर पत्रिका इत्यादि वृत्तपत्रांना पाठवित होतो. ते विचार १९७७ आणि १९७८ मध्ये लोकमत, तरुण भारत आणि नागपूर पत्रिका इत्यादि वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेत.




**भदंत डॉ. कौसल्यायन यांच्या सहवासात :** भदंत डॉ. आनंद कौसल्यायन हे हिंदीचे मोठे साहित्यिक आणि बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक होते. ते कार्यक्रमाच्या निमित्ताने वर्ध्याला यायचे. यशवंत महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्रा. मधुकर कासारे यांच्याशी भंतेजींचा चांगला परिचय होता. एके दिवशी प्रा. कासारे सरांनी मला निरोप पाठविला होता की, भदंत डॉ. आनंद कौसल्यायन हे वर्ध्याला येणार असून, ते राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या विश्रामगृहात थांबणार आहेत. आपण त्यांची सेवा करावी. त्यावेळी मी बाराव्या वर्गात शिकत होतो. तो १९७७ च्या डिसेंबर महिन्यातील शेवटचा आठवडा होता. प्रा. कासारे यांच्या सुचनेनुसार मी राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या विश्रामगृहात गेलो. तेथे भंतेजी होते. मी त्यांना वंदन केले आणि बाजूला उभा राहिलो. त्यांना सांगितले की, “ प्रा. कासारे सरने मुझे भेजा है.”

“हाँ, उन्होंने मुझे बताया. आपका क्या नाम हैं?

“ प्रदीप आगलावे!” मी माझे नाव सांगितले.

“क्या बताया, आगलगावे?”

“आगलगावे नही. आगलावे!”

“आगलावे. बराबर हैं ना?” भंतेजींनी विचारले.

“हाँ, भंतेजी!” मी नम्रपणे म्हणालो.

त्यानंतर त्यांनी सांगितलेली काही कामे केलीत. रात्री मी सेवाग्रामला वापस आलो. वर्ध्याला भंतेजींचा दोन-तीन दिवस मुक्काम होता. दुसऱ्या दिवशी मी त्यांना भेटायला गेलो. त्यावेळी ते ‘हिन्दू समाज किधर’ या पुस्तकाचे प्रूफ तपासत होते. त्यांची काही कामे केली. त्यानंतर त्यांनी मला एका स्टूलवर बसायला सांगितले. ते म्हणाले की, “प्रूफ जांचने का काम कठीण है.”

मी चूपचाप त्यांना ऐकत होतो. ते म्हणाले, “देखो वहां झाडू पडा है.”

“हाँ भंतेजी! कमरे की सफाई करनी है?”

“नही! नही!”

“मैं यह बताना चाहता हूँ की, झाडू जितनी बार लगाओ, उतनी बार कुछ ना कुछ कचरा निकलता है. उसी प्रकार जितनी बार प्रूफ पढों, उतनी बार कुछ ना कुछ गलतीयां निकलती है.” भंतेजींचे म्हणणे चटकन माझ्या लक्षात आले. कारण मागील वर्षांपासूनच मी कथा, कविता आणि लेख लिहीत होतो. मी माझ्या लेखनाबद्दल भंतेजींना सांगावे असे वाटले. परंतु स्वतःच्या लेखनाबद्दल सांगण्याची हिम्मत नव्हती. भंतेजी हे फार मोठे साहित्यिक आहेत. मी सहाव्या वर्गात शिकत असताना हिंदीच्या पुस्तकात ‘मेहमान’ नावाचा धडा आम्हाला अभ्यासात होता. आपण तर बाराव्या वर्गात शिकणारा एक साधा विद्यार्थी आहो. त्यांना स्वतःबद्दल सांगणे योग्य नाही. त्यांना काय वाटेल? असा विचार करून मी गप्प राहिलो.

रोज मी भंतेजींची सेवा करायचा. असेच दोन - तीन दिवस गेलेत. भंतेजींचा वर्धा सोडण्याचा दिवस उजाडला. शेवटच्या दिवशी मी त्यांना हळूच विचारले, “भंतेजीं एक बात बताऊँ?”

लगेच ते म्हणाले, “बताओ!’

तेव्हा मी सांगितले की, “मैं लिखता हूँ. अब तक मैंने कुछ कहानियाँ, कविताएँ और लेख लिखे हैं.”

हे ऐकून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, “यह तो अच्छी बात है. तो, आप भी लेखक हो!” असे म्हणून ते हसू लागले.

“तुम्हारे लेख मुझे दिखाना!” भंतेजी म्हणाले.

“हाँ भंतेजीं! लेकिन मुझे डर लगता है. आपको पसंद नही आएँगे.”

तेव्हा भंतेजी म्हणाले, “यह कैसी बात कर रहा है. अपना लेखन किसी को पसंद आने या न आने की कोई बात नहीं है. जो तुम्हे लगता है, वो लिखते जाओ.”

भंतेजींच्या या उपदेशामुळे माझ्या मनातील भीती निघाली आणि मला लिहिण्यासाठी आणखी प्रोत्साहन मिळाले. त्यानंतर भंतेजी माझ्या लेखनाच्या संदर्भात नेहमी विचारपूस करायचे. भंतेजींशी पत्रव्यवहार केला. त्यांनी देखील पत्रे पाठविलीत. पुढे त्यांच्यासोबत नागपूर, औरंगाबाद, नांदेड इत्यादि ठिकाणी प्रवास केला.

**वडिलांनी पहिली कादंबरी लिहून घेतली :** आपल्या मुलांनी खूप शिकावे! खूप लिहावे! अगदी मोठं-मोठे ग्रंथ लिहावे. असे माझ्या वडिलांना मनोमन वाटायचे. म्हणून त्यांनी मला पुस्तक लिहिण्याची प्रेरणा दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी एकोणीसाव्या वर्षी माझ्याकडून एक कादंबरी लिहून घेतली. ही साधी बाब नव्हती. वर्ध्याच्या यशवंत महाविद्यालयात बी. ए. प्रथम वर्षाला शिकत असताना वडिलांनी एके दिवशी मला विचारले, “तू लेख, कविता आणि कथा लिहितोस; पुस्तक का लिहित नाहीस?” तेव्हा वडिलांना सांगितले, “पुस्तक लिहिणे मला जमणार नाही.” “का नाही?” असा प्रश्न त्यांनी मला विचारला. नंतर वडिलांनी लगेच ‘लोकसत्ता’ या वर्तमानपत्रांमध्ये आलेली बातमी मला दाखविली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे नवोदित लेखकाने अनुदानासाठी साहित्य पाठवावे; अशी ती बातमी होती. तेव्हा वडिलांना म्हणालो, “मी प्रयत्न करतो!”

तीन-चार दिवसांनी वडिलांनी विचारले, “तू लेखन सुरू केले की नाही?”

“नाही.” मी उत्तर दिले.

तेव्हा ते माझ्या डोळ्यात बघत म्हणाले, “तू प्रयत्न तर कर!”

“ठीक आहे.” मी त्यांच्या समाधानासाठी म्हणालो. परंतु पुस्तक लिहिण्याची माझी तयारी नव्हती. तरी देखील वडिलांच्या सांगण्यानुसार १२ डिसेंबर १९७८ पासून कादंबरी लेखन सुरू केले. आश्रममधील माझ्या खोलीत सायंकाळी लेखन करायचो. रात्री जेवण करण्यासाठी घरी गेल्यानंतर कादंबरीचा लिहिलेला भाग वडिलांना वाचून दाखवायचो. त्यामुळे माझ्या कादंबरीचा वाचनकर्ता मी आणि श्रोता माझे वडील होते. कादंबरीचे लेखन करून वडिलांना रोज वाचून दाखवावे लागत असल्यामुळे माझ्या कादंबरी लेखनात खंड पडला नाही. १६ जानेवारी १९७९ रोजी कादंबरीचे लेखन पूर्ण झाले. अवघ्या ३६ दिवसात माझी पहिली कादंबरी लिहून पूर्ण झाली होती. माझी कादंबरी लिहून पूर्ण झाल्यानंतर वडिलांना खूप आनंद झाला होता. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मी आयुष्यात कधी विसरू शकत नाही. त्यांचा तो आनंद आज देखील मला प्रेरणा देतोय! ‘उगवता क्रांतिदूत’ हे त्या माझ्या पहिल्या कादंबरीचे नाव होते. पहिली कादंबरी लिहून झाल्यानंतर माझा लेखनाबद्दलचा स्वविश्वास आणखी वाढला. मी पुस्तक लेखन करू शकतो याची जाणीव झाली. म्हणून ‘रजनी’ ही कादंबरी २६ मे १९७९ रोजी पूर्ण केली. त्याचवर्षी आनंदराव वासनिक या एका आंबेडकरी कार्यकर्त्याच्या जीवनावर ‘फुले फुलली श्रमाची’ ही तिसरी कादंबरी ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७९ मध्ये लिहिली. आयुष्यात आलेल्या प्रसंगातून शिकायचे असते! जो शिकतो तोच प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करु शकतो. त्यातूनच आपण घडत असतो. घडण्याची प्रक्रिया सतत सुरु राहते अगदी शेवटच्या श्वासापर्यंत!●●

**कायदेविषयक मार्गदर्शन मोफत**
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ | वर्ष : ६ | अंक : २६२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Tuesday, 22 September 2026 | Year : 6 | Issue : 262 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. २२ सप्टेंबर २०२६**



१९४४- मद्रास म्युनिसिपल कार्पोरेशन तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मेयर डॉ. सय्यद नियामुल्ला यांचे हस्ते चांदीच्या करंड्यातून मानपत्र अर्पण. तसेच आंध्र चेंबर्स आफ कॉमर्स, मद्रास तर्फे बाबासाहेबांना मानपत्र.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

# एसआयआर : मतदानाचा हक्क हिसकावून घेण्याचा हा एक मार्ग : कॉंग्रेस




**नवी दिल्ली :** कॉंग्रेस पक्षाने सोमवारी म्हटले की, निवडणूक आयोगाची विशेष सखोल पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रिया ही भारतीयांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा एक मार्ग आहे. राष्ट्रीय राजधानीतील लोकांना त्यांच्या मतदार नोंदणी अर्जात दिलेल्या माहितीतील विसंगतीबद्दल ३३.१३ लाख नोटिसा बजावण्यात आल्याने निर्माण झालेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर हे विधान आले आहे. यातील बहुतांश नोटिसा २००२ मध्ये घेण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या मागील विशेष सखोल पुनरावलोकनातील माहितीशी जुळत नसल्यामुळे बजावण्यात आल्या होत्या. मतदार यादीतील तफावतींबाबत जारी केलेल्या नोटीसमध्ये दिवंगत अर्थशास्त्रज्ञ बिबेक देबरॉय यांचे नाव आल्याच्या टीकेला उत्तर देताना, कॉंग्रेसचे संपर्क विभागाचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, 'खरे तर, भारतीयांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याची एक पद्धत येथे अवलंबली जात आहे.'



सोमवारी, कॉंग्रेस पक्षाने खाद्यपदार्थांच्या गगनाला भिडणाऱ्या किमतींवरून मोदी सरकारवर निशाणा साधला. त्यांनी १९७७ सालच्या प्रसिद्ध बॉलिवूड गाण्याचा, 'क्या हुआ तेरा वादा'चा, संदर्भ देत महागाईवर सरकारच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जयराम रमेश यांनी एक मीडिया रिपोर्ट शेअर केला. त्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, डाळी आणि खाद्यतेलासह अनेक खाद्यपदार्थांच्या वाढत्या किमतींमुळे घरगुती बजेट पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. ते म्हणाले, 'देशातील खाद्यपदार्थांच्या गगनाला भिडणाऱ्या किमतींनी मध्यम आणि गरीब वर्गाचे कंबरडे मोडले आहे.' त्यांनी दावा केला की, दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती गगनाला भिडत असून, त्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन कठीण होत आहे. पंतप्रधानांना कोणते प्रश्न विचारले पाहिजेत? कॉंग्रेस नेते म्हणाले, *'पण प्रधानमंत्री महागाईवर गप्प आहेत. देश विचारत आहे, 'प्रधानमंत्री, ते 'चांगले दिवस' कुठे गेले?' ते फक्त भाषणांपुरतेच मर्यादित आहेत का?'* ते म्हणाले की, लोक भुकेने मरत आहेत आणि सरकार गप्प आहे. त्यांनी प्रश्न विचारला की, हाच का नवा भारत? १९७७ सालच्या 'हम किसी से कम नहीं' या चित्रपटातील एका प्रसिद्ध बॉलिवूड गाण्याचे बोल उद्धृत करत रमेश म्हणाले, 'तुमच्या वचनाचे काय झाले? ती शपथ, तो इरादा?' कॉंग्रेसचे सरचिटणीस म्हणाले की, मोदी सरकारने अनियंत्रित महागाईविरोधात तातडीने कठोर कारवाई करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा. कॉंग्रेस वाढत्या महागाईचा मुद्दा सातत्याने उपस्थित करत असून, सरकार जनविरोधी धोरणे अवलंबत असल्याचा आरोप करत आहे.

## कॉंग्रेस-समाजवादी पार्टीची एकत्र लढण्याची घोषणा, पण सर्व जागांवर 'स्वबळा'चीही तयारी

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक इंडिया आघाडी म्हणून एकत्र लढू, असे समाजवादी पार्टी आणि कॉंग्रेस यांनी अगोदरच जाहीर केले आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी अनेकवेळा याचा उच्चार केला आहे, तर कॉंग्रेसच्या नेतृत्वाकडूही अशीच भूमिका मांडली गेली आहे. पण, दोन्ही पक्षांनी सर्वच मतदारसंघांमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचीही तयारीही सुरू केली आहे. त्यामुळे एकत्रच लढणार की ऐनवेळी स्वबळावर उतरणार, अशी शंका आता उपस्थित होऊ लागली आहे.



कॉंग्रेसमध्ये घाईगडबडीचे वातावरण पाहायला मिळत आहे. कॉंग्रेसला उत्तर प्रदेशमध्येसमाजवादी पार्टीशी आघाडी करूनच निवडणूक लढवायची आहे, पण त्यांना लवकरात लवकर जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित करायचा आहे. पक्षाला कोणत्या जागांवर निवडणूक लढवायची आहे, त्या जागांची राजकीय समीकरणे काय आहेत आणि कोणाला उमेदवारी देऊन जिंकून आणता येईल, यासाठी कॉंग्रेसचे नेते आग्रही आहेत. दुसरीकडे, समाजवादी पार्टी जागावाटपाबाबत कोणतीही घाई दाखवत नाहीये. उत्तर प्रदेशमध्ये स्वतःची तयारी पूर्ण झाल्यावरच जागावाटपावर चर्चा करण्याची अखिलेश यादव यांच्या पार्टीची इच्छा आहे.

# दिघोरी-कमाल चौक उड्डाणपुलाला सम्राट अशोकांचे नाव द्या

## संविधान परिवार व प्रबुद्ध नागरिकांची मागणी; सम्राट अशोक चौकात निदर्शने



**नागपूर :** दिघोरी ते कमाल चौक दरम्यान बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाला 'चक्रवर्ती सम्राट अशोक उड्डाणपूल' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी संविधान परिवार नागपूर, सम्राट अशोक मित्रपरिवार, बौद्धप्रिय वा. को. गाणार यांच्यासह विविध सामाजिक संघटना, कर्मचारी संघटना आणि प्रबुद्ध नागरिकांनी केली. या मागणीसाठी सोमवारी सम्राट अशोक चौक येथे भव्य निदर्शने करण्यात आली. त्यानंतर नागपूर जिल्हाधिकारी अनुप खांडे यांना निवेदन दिले आहे. उड्डाणपुलाचे नामकरण करताना नागरिक व विविध संघटनांशी कोणतीही पूर्वचर्चा अथवा सूचना करण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. नागपूरचा विकास होत असताना शहराचा इतिहास, संस्कृती आणि महापुरुषांचा सन्मानही जपला जावा, अशी भूमिका यावेळी मांडली. इंदोरा ते दिघोरी या संपूर्ण मार्गाला एकच नाव देण्याऐवजी विविध भागांना नागपूरच्या इतिहासाशी संबंधित महापुरुषांची नावे देण्याचा प्रस्ताव निवेदनातून देण्यात आला. त्यानुसार दिघोरी ते सक्करदरा – संत हजरत बाबा ताजुद्दीन उड्डाणपूल, सक्करदरा ते रेशीमबाग चौक – डॉ. केशव बळीराम हेडगेवार उड्डाणपूल, रेशीमबाग चौक ते डागा हॉस्पिटल चौक – चक्रवर्ती सम्राट अशोक उड्डाणपूल आणि डागा हॉस्पिटल चौक ते कमाल चौक – महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल, अशी नामकरणाची मागणी केली आहे .
ही मागणी कोणत्याही धर्म, समाज किंवा व्यक्तीच्या विरोधात नसून सर्व महापुरुषांचा सन्मान आणि त्यांच्या योगदानाची ओळख कायम राहावी, हा उद्देश असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले.
निदर्शनांमध्ये ॲड. मिलिंद गाणार, प्रा. राहुल मून, विजय भाबरे, सुरेश गाणार, राजेंद्र साठे, आदित्य गाणार, सागर चव्हाण, विवेक इंगळे, सिद्धार्थ सरदार, सिद्धार्थ कांबळे यांच्यासह महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# महत्वाच्या बातम्या

## ओडिशा पाठ्यपुस्तक वाद: सीजेपीनेही या आंदोलनाला पाठिंबा दिला



**भुवनेश्वर :** कॉंक्राज जनता पक्षाने (सीजेपी) शालेय पाठ्यपुस्तकांमधील कथित चुकांवरून ओडिशामध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. शालेय आणि जनशिक्षण मंत्री नित्यानंद गोंड यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या नव निर्माण युवा छात्र संघटनेच्या (एनवायसीएस) आंदोलकांना पक्षाने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. पक्षाच्या 'शाळा सुधारा' मोहिमेअंतर्गत ओडिशामध्ये असलेले सीजेपीचे सह-संयोजक सौरव दास यांनी सोमवारी भुवनेश्वर येथे सांगितले की, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि पाठ्यपुस्तकांमधील चुकांसाठी जबाबदारी निश्चित करण्याच्या मागणीला पक्षाचा पाठिंबा आहे.

## हॉस्टेलमध्ये अंधाराचा फायदा घेत झोपेतच कापल्या १० विद्यार्थिनीच्या वेण्या



**आंध्र प्रदेश :** आंध्र प्रदेशच्या विशाखापट्टनम जिल्ह्यात विद्यार्थिनीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याठिकाणी कृष्णापुरम येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील इयत्ता नववीच्या १० विद्यार्थिनींच्या वेण्या रात्री झोपेत कापण्यात आल्या. सकाळी जेव्हा विद्यार्थिनींना जाग आली तेव्हा त्यांचे केस कापल्याचे आढळले. त्यानंतर शाळेत गोंधळ उडाला. या घटनेमुळे विद्यार्थिनीच्या मनात भीती पसरली आहे आणि शालेय सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. १६ सप्टेंबरच्या रात्री ही घटना घडली. त्यारात्री ६ विद्यार्थिनी एका खोलीत आणि ४ दुसऱ्या खोलीत झोपल्या होत्या. सकाळी उठल्यानंतर १० विद्यार्थिनीच्या वेण्या कापलेल्या आढळल्या. रात्रीच्या अंधारात अज्ञात व्यक्ती शाळेच्या परिसरात दाखल झाला आणि त्याने झोपेत असणाऱ्या मुलींच्या वेण्या कापल्या असा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेबाबत सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

## आयआयटी-मुंबई प्रकरणामुळे आनंद रंगनाथन यांचा एससी/एसटी कायद्यावर इशारा




**मुंबई :** अलीकडील आयआयटी-मुंबई प्रकरणानंतर अनुसूचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. या प्रकरणात, साहिल वाकोडेच्या वडिलांनी जातीय छळ आणि मानसिक अत्याचाराचा आरोप केल्यानंतर, प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांच्यावर अनुसूचित जाती/जमाती कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'स्क्रुटिनी'च्या एका भागात, लेखक आणि राजकीय भाष्यकार आनंद रंगनाथन यांनी कायद्यातील २०१८ च्या सुधारणांचे परीक्षण केले होते आणि त्यांच्या संभाव्य गैरवापराबाबत चिंता व्यक्त केली होती. रंगनाथन यांनी कायद्यांतर्गत नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदणी, अटकपूर्व जामीन आणि अटकेला मंजुरी यासंबंधीच्या तरतुदींवर चर्चा केली. त्यांनी खोटे गुन्हे दाखल होण्याची आणि गैरवापराची शक्यता असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी व्यक्त केलेल्या चिंतेचा संदर्भ दिला. त्यांनी त्यानंतरच्या कायदेशीर बदलांवर आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांवरही चर्चा केली, ज्यांनी अटकपूर्व जामिनासह कायद्याच्या काही पैलूंमध्ये बदल केले. रंगनाथन यांनी असा युक्तिवाद केला की, काही तरतुदींचा वापर ब्लॅकमेल करणे, हिशोब चुकवणे आणि जमिनीचे वाद यांसारख्या उद्देशांसाठी केला जाऊ शकतो.

## जम्मू आणि काश्मीर विधानसभेत गदारोळ, आमदारांमध्ये झाली झटापट



**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीर विधानसभेचे सात दिवसीय हिवाळी अधिवेशन आज सुरू झाले. २१ सप्टेंबर रोजी जम्मू आणि काश्मीर विधानसभेत मोठा गदारोळ झाला. विरोधी आणि सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी घोषणाबाजी केली आणि अचानक धक्काबुक्की सुरू झाली. एनएचएम कर्मचाऱ्यांच्या मुद्द्यावर भाजप आमदारांच्या विरोधामुळे जम्मू आणि काश्मीर विधानसभेत हा गदारोळ आणि धक्काबुक्की झाली. या गदारोळातही मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सभागृहात आपले भाषण सुरू ठेवले.

**अनाथपिंडीक परीवार महिला क्रेडीट सहकारी संस्था मर्या.**
मुख्य शाखा ब्लॉक नं. 103, पहिला माळा, विंग 'अ',
हनी अर्चना कॉम्प्लेक्स, मेडिकल रोड, उंटखाना नागपूर-440009

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**
(फक्त संस्थेच्या साभासदांकरिता)

संस्थेच्या सर्व सभासद बंधू आणि भगिनींना सूचित करण्यात येत आहे की, आपल्या संस्थेची 13 वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 25/9/2026 रोज शुक्रवारला सकाळी 12.00 वाजता संस्थेच्या अध्यक्षा आयु. प्रा. डॉ. सरोज प्रदिप आगलावे यांचे अध्यक्षतेखाली तसेच संस्थेचे संस्थापक आयु. इंजी. पी. एस. खोब्रागडे साहेब यांचे प्रमुख उपस्थितीत घेण्याचे निश्चित केले आहे. तरी नियोजित वेळी उपस्थित राहावे हि विनंती.

स्थळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह,
उर्वेला कॉलोनी, वर्धा रोड, नागपूर.

नोट : सभासदांना नोटीस न मिळाल्यास हीच नोटीस समजून सभेला उपस्थित राहावे.

संचालक मंडळाच्या वतीने
आयु. डॉ. सरोज प्रदिप आगलावे (अध्यक्षा)
अनाथपिंडीक परिवार महिला क्रेडीट सह.
संस्था मर्या. नागपूर जिल्हा.

PAGAAM PAGAAM
**निमंत्रण**
**पैगाम**
फुले-आंबेडकरी गौरवशाली आणि आदर्शवादी मोहीम
"एक व्यक्ती का संकल्प विचार बन सकता है,
विचार जागरूकता बन सकता है, और जागरूकता
सामाजिक परिवर्तन की दिशा मजबूत कर सकती है।"
23 सितंबर — समानता के संकल्प का दिन
बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर ने अपने जीवन में जातिगत भेदभाव और अपमान को स्वयं झेला, जिसने उनके सामाजिक संघर्ष को और अधिक दृढ़ बनाया। समानता केवल संविधान के पन्नों में लिखी हुई भावना नहीं, बल्कि हमारे व्यवहार, विचार और सामाजिक व्यवस्था का आधार होनी चाहिए।
आइए, बाबासाहेब के बताए समानता, शिक्षा, आत्मसम्मान और सामाजिक न्याय के मूल्यों को अपने जीवन में उतारने का संकल्प लें। इसी उद्देश्य से पैगाम द्वारा एक विशेष वैचारिक परिचर्चा का आयोजन किया जा रहा है।
कार्यक्रम विवरण
विषय: सामाजिक समानता प्रस्थापित करने के लिए सामाजिक परिवर्तन होना जरूरी है।
दिनांक: 23 सितंबर 2026, बुधवार | समय: सायं 6.00 बजे | स्थान: कॉन्फ्रेंस हॉल, आंबेडकर सांस्कृतिक भवन, उर्वेला कॉलोनी, वर्धा रोड, नागपुर
मुख्य वक्ता: मा. अशोक सरस्वती | प्रमुख उपस्थिति: मा. ज्ञानेश्वर रक्षक | कार्यक्रम अध्यक्ष: मा. प्रशांत पन्तोडे (GM, BSNL, नागपुर)
"सामाजिक परिवर्तन केवल दूसरों से अपेक्षा करने से नहीं,
बल्कि स्वयं से शुरुआत करने से आता है।"
विशेष सूचना: कार्यक्रम उपरांत स्नेहभोजन की व्यवस्था हॉल परिसर में की गई है।
आपकी उपस्थिति सादर प्रार्थनीय है।
विनीत
नागपुर पैग़ाम टीम






“ दुसऱ्याला मदत करण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य आहे... ”



# अमेरिकेसमोर शरणागती जनतेस मोदीजींनी वाढदिवसाचे दिलेले रिटर्न गिफ्ट/भेट

## युपीआई शुल्क




केन्द्र सरकारने दोन हजार रुपयापेक्षा जास्त युपीआई संव्यवहारावर (भुगतानवर) 0.4टक्के दराने 15.10.2026 पासून शुल्क लावण्याचा (म्हणजे भारतीय जनतेवर लादण्याचा) निर्णय घेतला आहे व याला सुंदर, आकर्षक इंग्रजी कॉर्पोरेट नाव 'एमडीआर' म्हणजे मरचंट डिस्काउंट रेट दिले आहे. यामुळे खिशाला कात्री लागली तरी जनता हसत खेळत मुकाट्याने सहन करेल. तसेही आता फाटलले कपडे म्हणजे फॅशन झाली आहे. भाजपाचे प्रवक्ते मोठ्या निर्लज्जपणे सांगतात की 'सामान्य जनतेवर थोडीच लावले आहे, व्यापारी वर्गावर लावले आहे. व्यापारी, छोटे उद्योजक हे काय भारतीय नागरिक नाही आहेत काय? पाकिस्तानी, नक्सली, हिंदू विरोधी आहेत काय? व्यापारी वर्गावर कर लादला तर शेवटी वसूली सामान्य जनतेकडूनच होते हे समजायला खूप बुद्धीमत्तेची गरज नाही आहे. जीएसटीचा भार जनताच वहन करीत आहे ना. धारदार अस्त्र टरबुजावर पडले काय किंवा टरबुज धारदार अस्त्रावर पडले काय अंतिम परिणाम एकच येतो. खिश्यावर भार सामान्य जनतेच्याच पडणार हे एकदम स्पष्ट आहे. भाजपाचे प्रवक्ते निर्लज्जपणे आणखी बोलतात की ₹.2000/- च्या वर फक्त 4-5टक्के व्यवहार होतात. परंतु या 4-5टक्के व्यवहारात 65टक्के रकम अंतर्भूत आहे हे सांगणार नाहीत. मागच्या वर्षी युपीआईद्वारे 314 लाख कोटीचे व्यवहार झालेत. यामधे 207 लाख कोटीचे व्यवहार हे 2000 च्या वरच्या रकमेचे होते. युपीआई चा मुळ कायदा हा शुल्क रहित होता. याच्यासाठी व 'कैशलेस डिजीटल' सुविधेसाठी सरकारने जनतेकडून खूप पाठ थोपटुन घेतली. लोकांना आता डिजीटल व्यवहाराची सवयपण झाली आहे. बँक, वित्तीय संस्थान यांना पण खूप सुविधा झाली, कारण आता त्यांना एवढी रोकड व व्यवहार सांभाळण्याची गरज राहली नाही, मॅनपॉवर मधे बचत झाली. जीओच्या धरतीवरच सरकार चालत आहे. आधी फ्री-फ्री आणि नंतरचा प्रकार सगळ्यांनाच माहिती आहे. विशेष म्हणजे अर्थमंत्री श्रीमती सितारामन यांनी ऑगस्टमधेच घोषणा केली होती की यूपीआई डिजीटल व्यवहार सुविधावर शुल्क आकारले जाणार नाही. वित्तमंत्रालय व केंद्रसरकार यांच्या स्टेटमेंटमधे खूप विरोधाभास आहे. एकीकडे वित्तमंत्रालय म्हणते की, हे शुल्क सरकारी तिजोरीत जमा होईल. तर केंद्र सरकार म्हणते की, हे सरकारी तिजोरीत जमा होणारे शुल्क किंवा टैक्स नाही आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार युपीआई शुल्क हे बँकांना, सुविधा/सर्विसेस देणाऱ्या, युपीआई ऐप देणाऱ्याना आर्थिक पाठबळ देण्यासाठी आकारण्यात येणार आहे. सध्या युपीआई संचालित करणारी संस्था एनपीसीआई फायद्यात आहे. भारतीय खाजगी किंवा राष्ट्रीय बँकाची सध्याची आर्थिक व लाभप्रदत्ताची स्थिती उत्तम व समाधानकारक आहे. तसेही बँका सर्वच सुविधेसाठी (चेकबुक/पासबुक सुविधा, खाता विवरण, एटीएम डेबिट/कार्ड इत्यादी) ग्राहकाकडून सेवाशुल्क वसूल करीत आहेतच. युपीआई शुल्क लावल्याने ग्राहक परत नकदी व्यवहाराकड़े वळतील. त्यामुळे बँकांना नगदी प्रबंधनसाठी अतिरिक्त ख़र्च, मॅनपॉवर लागेल जे लाभप्रद होणार नाही. युपीआई सर्विसेस व ॲप उपलब्ध करुन देणाऱ्याना निश्चिच फायदा होईल. युपीआई ॲप उपलब्ध करणारे फोनपे, गूगलपे, ॲमेझॉन पे हे विदेशी अमेरिकन कॉर्पोरेट्स, मोठे उद्योजक आहेत. यावरून युपीआई शुल्क आकारणी कोणाच्या भल्याचे आहे हे सहज लक्षात येते. याची पालेमुळे फेब्रुवारी 2026 मधे अमेरिका सोबत झालेल्या व्यापार (ट्रेड) डील मधे आहेत.

काही वर्षापासून भारतातून आयात व्यापारच्या बाबतीत अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प भारत सरकारला नाचवित आहे, मनमर्जीप्रमाणे टेरिफ दर लावीत व घोषित करत आहे. वर्तमान केंद्र सरकार व त्याचे प्रमुख यांनी ट्रम्पसमोर पूर्णपणे शरणागती पत्करल्याचा भास होतो. ट्रम्प नेहमी त्याच्या बोलण्यातून व वक्तव्याद्वारे भारताची व प्रधानमंत्री मोदी यांची मानहानी करीत असतो. परंतु आमच्याकडून त्यांचा साधा विरोधही होत नाही. एवढी मानहानी गेल्या 75 वर्षात एकाही पीएमची झालेली नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची आर्थिक हालात खस्ता होती. परंतु एकही प्रधानमंत्री अमेरिकेच्या दादागिरीसमोर झुकला नाही व स्वबळावर भारतदेश कृषीप्रधान आत्मनिर्भर झाला. मोदीजीच्या आधी एकाही पीएमने देशाची संप्रभुता, आत्मसन्मान यासोबत समझौता केला नाही. ट्रम्पच्या दवाबाखाली भारताने पारंपरिक व्यापारीक मित्र राष्ट्र व ब्रिक्सचे सहयोगी देश जसे रशिया, इराण यांच्याशी फारकत घेतली आहे व चढत्या दराने क्रूड तेल व इतर सामान खरेदी करीत आहे. फेब्रुवारी 2026 मधे अमेरिका-भारत ट्रेड डील झाले. डील अटी प्रमाणे 1. येत्या 5 वर्षात भारताला ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान, कोळसा, शेतीमाल इत्यादी अमेरिकेकडून 500 बिलीयन डॉलर आयात/खरेदी करायची आहे तेही शून्य 0टक्के किंवा अत्यल्प टेरिफ दरावर. म्हणजे दरवर्षी निदान 100 कोटीची आयात अमेरिकेकडून करायची आहे. वर्ष 2024-25 मधे भारताचा निर्यात 86.51 बिलीयन डॉलर (वृद्धी 11.6टक्के) तर आयात 45.33 बिलीयन डॉलर (वृद्धी 7.4टक्के) होती. म्हणजे अमेरिकासोबत विदेशी व्यापार संतुलन हे भारताच्या बाजूने (surplus 41.18 बिलीयन डॉलर, वृद्धी 16.6टक्के) आहे. जर भारताचा आयात 45.33 बिलीयन डॉलरवरून 100 बिलीयन डॉलरपेक्षा जास्त झाला (या तुलनेत भारताचा निर्यात निश्चितच वाढणार नाही) तर आंतरराष्ट्रीय व्यापार संतुलन हे अमेरिकेच्या बाजूने झुकेल हे वेगळे सांगायाची गरज नाही आहे.

2.अटीप्रमाणे डिजीटल व्यापारावर अमेरिकेचे नियंत्रण राहिल. आमचा डाटा अमेरिकेला निर्बाधित फ्लो होईल आणि सोअर्सेस पण गुपित राहतील. म्हणजे आम्ही अमेरिकेच्या/ट्रम्प च्या हाताचे खेळणे बनणार. इलेक्ट्रानिक पेमेंट सुविधा युपीआई डिजिटल व्यवहार शुल्क रहित असल्यामुळे अमेरिकन कम्पन्यांना नुकसान होत आहे हेपण नमूद आहे. म्हणजे युपीआई शुल्क धोरणावर अमेरिका व ट्रम्प यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. प्रधानमंत्री मोदीजीनी आरएसएसचे सरसंघचालक श्री. भागवत यांच्याकडून बोध घ्यायला पाहिजे. नुकताच भागवतसाहेबांनी अमेरिकेचा दौरा केला, त्यांनी ठणकावून भाष्य केले की, 'भारताला हिंदू राष्ट्र घोषित करता येणार नाही. भारत बुद्धाचा देश आहे आणि शांती अपेक्षित आहे व अपेक्षाकृत शांती आहे. बाकी देश बुद्धाचे देश नाही आहेत, त्यामुळे ते युद्धाची भाषा बोलतात.' युद्धाची भाषा बोलण्यात व प्रत्यक्ष कृतीमधे आणण्यात अमेरिका आघाडीवर आहे. अमेरिकामधे असे वक्तव्य देणे धाडसाचे आहे. मोदीजी 56 इंच छातीचे धाडस ट्रम्पला दाखवा. मोदीजी स्वतंत्र, निष्पक्ष पत्रकारांच्या प्रश्नांना सामोरे जाऊन 56 इंच छातीचा धाडसीपणा दाखवा.●●



लक्ष्मण बोरकर
मो. 7709318607

## निश्चित काहीच नाही

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जीवन में एक बात तो तय है, कि तय कुछ भी नहीं.. मित्रांनो, आयुष्याकडे आपण कितीही नियोजन करून पाहिले, तरी शेवटी ते आपल्याला स्वतःच्याच नियमांनी जगायला शिकवते. आपण उद्याचे ठरवतो, पण उद्या नेमके काय घेऊन येईल, हे कुणालाच माहीत नसते. म्हणूनच कदाचित आयुष्याचे खरे सौंदर्य त्याच्या अनिश्चिततेत दडले आहे. कधी एखादा क्षण आपले संपूर्ण आयुष्य बदलून टाकतो, तर कधी एखादी छोटीशी भेट मनात कायमची जागा करून जाते. ज्याच्यावर आपण पूर्ण विश्वास ठेवतो, तो कधी दूर जातो आणि ज्याच्याकडून काहीच अपेक्षा नसते, तोच कधी कठीण प्रसंगी खंबीरपणे आपल्या सोबत उभा राहतो. हेच तर जीवनाचे गूढ आहे! म्हणून मित्रांनो, उद्याची चिंता करत आजचा दिवस हरवू नका. जे आपल्या हातात आहे ते मनापासून करा, माणसे जपा, नाती जपा आणि प्रत्येक क्षण मनापासून जगा. कारण भविष्य आपल्या मुठीत नसते, पण वर्तमानाचा क्षण मात्र आपल्या हातात असतो. आयुष्य म्हणजे बंद पुस्तक नाही; प्रत्येक दिवस त्यातले एक नवे पान असते. त्या पानावर काय लिहिले जाईल हे ठरलेले नसते. म्हणूनच संकट आले तर घाबरू नका आणि सुख आले तर गर्व करू नका. परिस्थिती बदलते, माणसे बदलतात, काळ बदलतो... आणि शेवटी आपल्यालाही बदलायला शिकावे लागते. एक गोष्ट मात्र नक्की - आयुष्यात काहीच निश्चित नसते. म्हणूनच प्रत्येक क्षणाला अर्थ देणे, प्रत्येक माणसाला माणूस म्हणून जपणे आणि आजचा दिवस आनंदाने जगणे, हेच कदाचित जगण्याचे खरे शहाणपण आहे..●●

# जंतरमंतर आंदोलनाचे 'AI भविष्य'




लाठ्या-काठ्यांचा काळ संपला, आता 'डिजिटल समन्स आणि अटक वॉरंट' घरोघरी पोहोचणार!

दिल्लीतील जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनाकडे जे लोक केवळ 'दगडफेक, लाठीमार आणि पोलिसांशी झटापट' या पारंपरिक दृष्टीने पाहत आहेत, त्यांना एका मोठ्या वास्तवाचा विसर पडला आहे.

हे देशातील पहिले 'AI-प्रोफाईल्ड' (AI-Monitored) आंदोलन ठरले आहे! लाठीमार करून गर्दी पांगवणे हा जुना जमाना होता. आज गृहमंत्रालय किंवा सुरक्षा यंत्रणांना घटनास्थळी कोणाला थेट पकडण्याची गरज उरलेली नाही. कारण तंत्रज्ञान तुमची प्रत्येक हालचाल रेकॉर्ड करत आहे.

जंतरमंतरवर एआय (AI) ने काय डेटा गोळा केलाय?

**१. फेशियल रिकग्निशन (Facial Recognition) :** सीक्रेट कॅमेरे, ड्रोन्स, टीव्ही चॅनेल्सचे व्हिडिओ आणि सोशल मीडियावरील हजारो रील्सच्या मदतीने प्रत्येक माणसाच्या चेहऱ्याचे एआय मॅपिंग झाले आहे.

**२. टॉवर डम्प आणि लोकेशन ट्रॅकिंग :** त्या दिवशी जंतरमंतरच्या टॉवरच्या कक्षेत कोणते मोबाईल नंबर सक्रिय होते, कुठून बोगस सिम वापरले गेले आणि मेट्रो स्टेशनवरून कोण बाहेर पडले, याचा सर्व डेटा एआयने एकत्र (Correlate) केला आहे.

**३. व्हिडिओ ॲनालिटिक्स :** दगड कोणी मारला? पोलिसांना चिथावणी कोणी दिली? उपोषणाला निरुपद्रवी कोण बसले होते? आणि राजकीय पक्षांचे पगारी कार्यकर्ते कुठे घुसले होते? या सर्वांचे A, B, C, D कॅटेगिरीत वर्गीकरण झाले आहे.

**आंदोलनाला चिथावणाऱ्यांसाठी सर्वात मोठे सरप्राईज :** ज्यांना वाटत होते की आपण पोलिसांना मारहाण करून किंवा दगडफेक करून गर्दीत पळून गेलो आणि वाचलो, ते पूर्ण भ्रमात आहेत!

**कोणतीही केस मागे घेता येणार नाही :** जुन्या काळात आंदोलनानंतर केसेस मागे घेतल्या जायच्या. आता एआयचे 'डिजिटल पुरावे' (Digital Evidence) कोर्टासमोर असतील, जिथे कोणतीही राजकीय मध्यस्थी चालणार नाही.

**घरोघरी समन्स आणि वॉरंट्स :** ए-आयने ओळख पटवलेल्या हिंसक उपद्रवींच्या थेट मूळ पत्यावर कोर्टाचे समन्स आणि डिजिटल एफिडेविट पोहोचतील. कारण मोबाईल क्रमांकाने आधार कार्ड इंटिग्रेट केले जातील आणि ते एका सेकंदात तपासले जाऊ शकतात ते याद्वारे.

**करिअर आणि नोकऱ्यांवर कायमची कुऱ्हाड :** पोलीस व्हेरिफिकेशन ब्लॉक झाल्यामुळे अनेक तरुणांचे पासपोर्ट, परदेशी शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांचे मार्ग या एका चुकीमुळे बंद होतील.



शत्रुघ्न लोणारे
94208 68365

अंतिम सत्य...शांततेने आंदोलन करणे हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. पण आंदोलनाचा वापर स्वतःच्या राजकीय हेतूसाठी करणाऱ्या आणि तरुणांना चिथावून हिंसेकडे ढकलणाऱ्या सूत्रधारांना ए-आयच्या या 'डिजिटल जाळ्यातून' सुटणे आता अशक्य आहे. शासनाने प्रसिद्ध केलेली भविष्यातील हजारो पानांची 'डिजिटल पुरावे पुस्तिका' जेव्हा समोर येईल, तेव्हा अनेकांचे बुरखे फाटतील! तंत्रज्ञानाच्या युगात आंदोलनाचे नियम बदलले आहेत. हे चिथावणीखोर जेवढ्या लवकर समजून घेतील, तेवढे बरे!

भास्कर (संशोधक, सायंटिफिक फोरकास्टिंग व माईंड ॲनालिसिस)●●

# परीक्षा व्यवस्थेचे आत्मपरीक्षण दोष कोणाचा?




परीक्षा प्रक्रियेभोवती निर्माण झालेल्या अलीकडील घटनांनी अनेक गंभीर प्रश्न समाजासमोर उभे केले आहेत. या संपूर्ण प्रकरणातून एक बाब स्पष्टपणे जाणवते - शासन, प्रशासन आणि जनतेमधील संवाद व समन्वयाचा अभाव. यामुळे विद्यार्थी, पालक आणि समाजामध्ये संभ्रम, अस्वस्थता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण क्षेत्र हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा कणा असते. त्यामुळे परीक्षा व्यवस्थेतील प्रत्येक निर्णय अत्यंत पारदर्शक, विश्वासार्ह आणि न्याय्य असणे आवश्यक आहे. दुर्दैवाने काही घटनांमुळे या व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या परिस्थितीसाठी केवळ शासन किंवा परीक्षा यंत्रणा जबाबदार आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. काही ठिकाणी अनैतिक मार्गाने यश मिळवण्याची मानसिकता, अवाजवी शुल्क घेणारे शिकवणी वर्ग, काही शिक्षकांची चुकीची भूमिका, काही पालकांची अवास्तव अपेक्षा आणि शॉर्टकट शोधणारे काही विद्यार्थी या सर्वांनी मिळून ही परिस्थिती निर्माण केली आहे. त्यामुळे दोष एका व्यक्तीचा नसून संपूर्ण व्यवस्थेतील त्रुटींचा आहे. परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा संघटनेला हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्याचा अधिकार नाही. पैशाच्या बळावर, तांत्रिक साधनांचा गैरवापर करून किंवा प्रभावाचा वापर करून प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय करणे हा समाजाविरुद्धचा गंभीर अपराध आहे. या घटनांमध्ये सर्वाधिक नुकसान होतकरू आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांचे झाले आहे. गरीब व गुणवंत विद्यार्थी संधीपासून वंचित राहतात, तर मध्यमवर्गीय विद्यार्थी नेहमीप्रमाणे मूकपणे अन्याय सहन करत राहतो. ही परिस्थिती शिक्षणव्यवस्थेसाठी अत्यंत चिंताजनक आहे. आज गरज आहे. ती आरोप-प्रत्यारोपांची नाही, तर आत्मपरीक्षणाची. सत्य स्वीकारण्याची, चुका मान्य करण्याची आणि त्या सुधारण्याची. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे; मात्र निर्दोष विद्यार्थ्यांचे भविष्य कोणत्याही परिस्थितीत अंधारात जाऊ देता कामा नये. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. त्यांची पायाभरणी जर अन्याय, भ्रष्टाचार आणि खोटेपणावर झाली, तर देशाचे भवितव्य धोक्यात येईल. म्हणूनच शिक्षण व्यवस्थेतील प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि नैतिकता पुन्हा प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे. आरशात दिसणाऱ्या चेहऱ्यापेक्षा मनाच्या आरशात डोकावून स्वतःतील दोष ओळखण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येकाने आपल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे आत्मपरीक्षण केले, चुका मान्य केल्या आणि त्यांची पुनरावृत्ती होणार नाही, याची हमी दिली तरच समाजाचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा दृढ होईल. विद्यार्थ्यांचे भविष्य हे कोणाच्याही स्वार्थापेक्षा मोठे आहे. म्हणूनच संवाद, समन्वय, सत्य आणि न्याय या मूल्यांच्या आधारावर शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे, हेच आजचे खरे राष्ट्रहित आहे.●●



उमेश चित्ते
मो.७७५८८४७१४३

# बुद्धाचे मानवाच्या बुद्धिला आवाहन




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोपारा येथे बुद्ध अवशेष सापडलेल्या ठिकाणी ६ मे १९५५ चा वैशाख पौर्णिमेचा दिवस घालविण्याचे ठरवताना म्हणाले भ. बुद्धाचा जन्म, बुद्धत्व प्राप्ती आणि महापरिनिर्वाण या तिन्ही घटना याच पौर्णिमेला झाल्या ही अद्वितीय घटना जगाच्या इतिहासात घडली. सोपारा येथे भ. बुद्धाच्या दातासाठी खास उभारलेल्या वास्तुत दात सुरक्षित असल्याचे संशोधकांना उत्खननात आढळले.

डॉ. बाबासाहेब पुढे म्हणाले, 'तत्कालीन मानव समाज अंधानुकरण, परावलंबन, भक्ती मार्ग, देव, आत्म्याच्या पोकळ डोलाऱ्याच्या पायावर विसंबून होता. पूजाअर्चा, धूप दीप, मंत्र तंत्र, जप तप, कर्म कांड, जीव हिंसा, नरबळी ईश्वर भक्तीसाठी, भूत प्रेत प्रसन्न करण्यासाठी केले जायचे. या मुळाशी पापी जीव जन्माला येतो. तेंव्हा पापक्षालनासाठी देह झिजवून तपत्याग साधल्याने ईश्वर प्राप्ती होऊन जन्माचे सार्थक होईल; मरणाच्या फेऱ्यातून सुटका होईल अशी भ्रामक कल्पना अस्तित्वात होती. अशा वेळेस भ. बुद्धाने ईश्वर, आत्म्याचे अस्तित्व नाकारले. बुद्धाशिवाय जगातील सर्व धर्मांनी ईश्वर व त्यासाठी निर्माण केलेले ग्रंथ प्रमाण मानले. प्रेषितांनी सांगितलेल्या वचनांची चिकित्सा करण्याचा, त्या वचनांतील सत्यता पडताळण्याचा, ते कसोटीवर चढवून जिज्ञासा तृप्त करण्याचा मार्गच बंद केला. तेंव्हा भ. बुद्ध मानवी बुद्धिला आवाहन करताना म्हणाले, 'मी सांगतो म्हणून स्वीकारू नका. तुमच्या बुद्धिला पटले तरच स्वीकारा. बुद्धाने चिकित्सेनंतर सागितला बुद्धधर्म आहे. धर्माने समाज धारणा निर्माण होते. रोग निदानानंतर दिलेले औषध म्हणजे बुद्धधर्म. जो धर्म माणसाला स्वतःचे दुःख, दारिद्रय, नाहीसे करावे असा मार्ग दाखवत नाही तो धर्मच नाही मेल्यानंतर स्वर्ग की नरक ही भीती दाखवून ऐतखाऊ लोकांनी धर्माला कुरण केले. लोकांना लुबाडण्याचा लबाडांनी व्यवसाय सुरू केला. बुद्धाने दुःखाची कारणे शोधली. ही कारणे वैयक्तिक, सामुदायिक, नैसर्गिक आहेत. त्यावर उपाय सांगितला, अष्टांगिक मार्ग तोच जीवन जगण्याचा मध्यम मार्ग आहे. त्या सोबत दहा प्रजा श्रेष्ठ पारमिता सांगितल्या. घराला आग लागली तेंव्हा मंत्रोच्चाराने नाही; आग पाण्यानी विझेल असे व्यवहारातून अष्टांगमार्गाने पारमिता मार्गाने सांगितले. बुद्ध शिवाय इतर धर्मांनी विद्वानांची बुद्धी कप्याकप्यात बंदिस्त, कुंठित केली. सत्यशोधन, सत्य ग्रहण टाळून पुस्तकी पंडितांचा वर्ग उदयास आला. भाराभर ग्रंथ वाचून गाढवाच्या पाठीवर लादण्यासारखे झाले. वर्तमानात दिवसागणिक ज्ञानात भर पडत आहे. कालचे ज्ञान भूतकाळात गेले असा ज्ञान विकास होताना आजच्या समस्येवर प्राचिन ग्रंथात उपाय शोधणे हास्यास्पद आहे. भ.बुद्ध म्हणाले, 'मानव जळता अग्नी आहे. अग्नी चेतवता येते, शांतही करता येते, विकार नाहिसे करता येतात.' हिंदू धर्माने 1 आत्म्याला अनन्य साधारण महत्व दिले. त्या आत्म्याचे स्थान, आकार, रंग, रूप, त्याला कोणी पाहिले का, त्याचा कोणी अनुभवला घेतला का याविषयी बड्या बड्या ऋषींनी कानावर हात ठेवले. मग आत्म्यासाठी हिंदूधर्म पुढाऱ्यानी पुनर्जन्माचा आधार घेतला. आत्मा शरीरात प्रवेश करतो असे म्हटल्यावर त्या शरीराची चिरफाड करून इतर अवयवासारखे आत्मा कोणीही काढून दाखवत नाही. बुद्धाने पुनर्जन्म, पुनर्निर्मिती स्वरुपात प्रायोगिक सिद्धतेने मानली, बीज-वृक्ष फले-फळे-बीज वृक्ष ही प्रक्रिया घडते. वृक्षांचे गुण नव्या वृक्षात दिसतात. अपत्यात आई-वडिलाचे गुण आढळतात. ही पुनर्निर्मिती बुद्धाने स्वीकारली. कर्माचा परिणाम कालांतराने भोगावा लागतो, जन्मांतराने नाही. बुद्धाने माणसाच्या सद्गुणांच्या वाढीसाठी वाव ठेवली. माणसाने विकासासाठी, उन्नतीसाठी प्रयत्न करावा. भाग्य ही संज्ञा फसवणूक आहे. प्रत्येकजन स्वतःला बलवत्तर करू शकतो. ते ज्यांचे त्यांच्यावर अवलंबून आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकृतीतून सिद्ध केले. ते भ. बुद्धाने कल्याणकारी मार्गाने २५०० वर्षांपूर्वी व्यवहारातून सार्वजनिक केले. प्रत्येकाने परावलंबी व्हावे स्वतःवर विश्वास करावा स्वतः जागृत व्हावे.●●

विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
9423606064

## वाचकांचे विचारपिठ

### मनापासून धन्यवाद!

दैनिक बहुजन सौरभ मध्ये प्रकाशित केला. त्याबद्दल आभार विशेष म्हणजे त्यामध्ये सुधार केल्याबद्दल अंतकरणातुन आभार उत्तम मुळे याच्यां संदर्भात जो लेख प्रकाशित झाला. त्यामुळे मला त्यांच्या सहवासातील अनेक लोकांचे फोन आले त्यामध्ये वरुड, पुलगाव, नागपुर, आणि त्यांच्या सोबत बोलुन अतिशय मन प्रसन्न झाले. दैनिक बहुजन सौरभ हा मोठ्या प्रमानात वाचल्या जातो. आपणास यासाठी धन्यवाद की आपण कोणताही भेदभाव न करता आमचे साहीत्य प्रकाशित करता यामुळेच दिवसंदिवस दैनिक बहुजन सौरभ ची प्रगती होत आहे. आपला जनवाद व इतर वर्तमान पत्रातला अनुभव दांडगा आहे. त्यामुळे उत्तम असे संचलन आपण करत आहात. या लेखाने आज मला एक वेगळी ओळख मिळाली त्याचे श्रेय आपणास आहे.●●

-प्रवीण कांबळे

### अशोक सरस्वती बोधी यांचा हृदयातील संवेदनांना हादरवून टाकणारा लेख

दि. २० सप्टेंबर २०२६, दै.बहुजन सौरभ मधील अशोक सरस्वती बोधी यांचा लेख हृदयातील संवेदनांना हादरवून टाकणारा आहे. त्यांचे सगळेच लेख अतिशय खतरनाक असतात. वाघाच्या तोंडात हात घालून दात मोजावेत, असे त्यांचे लेखन असते. सद्याच्या काळात बुध्दिजीवी लेखक वर्ग दहशतीत आहे, हे स्पष्ट दिसते. कारण आजुबाजूचे सामाजिक आणि राजकीय वातावरण लोकशाही व्यवस्थेला पोषक नाही. त्यांनी त्यांच्या लेखात लिहिले,"स्वतंत्र विचाराची बुद्धिजीवी लोक निर्भीड होऊन बोलतात त्यांनी बोलू नये म्हणून कलबुर्गी, पानसरे यांच्यासारख्या अनेक लोकांचा खून करण्यात आला. आता तो प्रकार मोठ्या प्रमाणात वाढेल. म्हणून गुलामीत जगण्यापेक्षा विरोध करून शहीद होणे कधीही चांगले. तसेही आपण मरणारच आहोत." हे त्यांचे विचार भूकंपाच्या धक्यासारखे आहेत. प्रस्तुत लेखक अशोक सरस्वती बोधी जर हिंदू लेखक असते, तर त्यांचा आतापर्यंत कलबुर्गी, पानसरे झाला असता. लोकशाही वाचवण्यासाठीचा पर्याय हा सत्ता परिवर्तनात असतो. तो बदल ईव्हीएमच्या पेटाऱ्यातून कसा होईल ? सगळे विरोधी पक्ष यावर आंदोलन करत नाहीत. लेखकांस अनेक सदिच्छा! स्वतःची काळजी घेणे कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी आवश्यक आहे.●●

-पुरूषोत्तम संबोधी

# प्रश्न केवळ मूर्तीचा नाही, तर सत्याच्या शोधाचा आहे!

# मूर्ती बुद्धाची की देवाची?




इतिहासाच्या पानांवर काही प्रश्न असे असतात, ज्यांची उत्तरे शोधताना वर्तमानाची राजकीय, धार्मिक आणि सामाजिक समीकरणेही हादरतात. तामिळनाडूतील सेलम जिल्ह्यातील पेरीयरी गावातील 'थलावेट्टी मुनियप्पन' मंदिरातील मूर्तीबाबत मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय असाच एका मोठ्या प्रश्नाला स्पर्श करून जातो. ही मूर्ती हिंदू देवतेची नसून भगवान बुद्धांची असल्याचे पुरातत्त्वीय तपासणीत निष्पन्न झाले आणि न्यायालयाने त्या निष्कर्षाला गांभीर्याने घेतले. मात्र या प्रकरणाचा अर्थ केवळ 'एक मंदिर बुद्धविहार ठरले' एवढाच काढणे धोकादायक ठरेल. याचा खरा अर्थ आहे, सत्य कोणत्याही श्रद्धेपेक्षा मोठे असते आणि पुरावा कोणत्याही पूर्वग्रहापेक्षा श्रेष्ठ असतो. मद्रास उच्च न्यायालयासमोर प्रश्न आला तो एका मूर्तीच्या ओळखीचा. बुद्ध ट्रस्टने दावा केला की पेरीयरी येथील मूर्ती मूळतः बुद्धांची आहे; कालांतराने तिची ओळख बदलली गेली आणि तिची पूजा 'थलावेट्टी मुनियप्पन' म्हणून सुरू झाली. राज्य सरकारकडून मात्र या ठिकाणी दीर्घकाळापासून स्थानिक लोक पूजा करीत असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. म्हणजेच एका बाजूला परंपरा आणि दुसऱ्या बाजूला इतिहास व पुरातत्त्वीय पुरावे उभे होते. न्यायालयाने या वादाचा निर्णय केवळ धार्मिक भावना किंवा प्रचलित परंपरेच्या आधारे न घेता पुरातत्त्वीय तपासणीचा मार्ग स्वीकारला. तज्ज्ञ समितीने मूर्तीची शिल्पवैशिष्ट्ये तपासली. अर्धपद्मासन, ध्यानमुद्रा, कुरळे केस, उष्णीष आणि लांब कानपाळी यांसारखी वैशिष्ट्ये आढळल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. या आधारावर मूर्तीमध्ये बुद्धांच्या महापुरुष लक्षणांशी संबंधित वैशिष्ट्ये असल्याचे मत नोंदवण्यात आले. या प्रक्रियेत न्यायपालिकेची भूमिका महत्त्वाची ठरते. न्यायालयाने कोणत्याही समाजाची श्रद्धा जिंकण्याचा किंवा हरवण्याचा प्रयत्न केला नाही; उपलब्ध पुराव्यांच्या आधारे मूर्तीची ओळख निश्चित करण्याचा प्रयत्न केला. परंपरा सामाजिक स्मृतीचा महत्त्वाचा भाग असली, तरी तीच ऐतिहासिक सत्याचा अंतिम पुरावा ठरत नाही. एखाद्या मूर्तीची शेकडो वर्षे एका विशिष्ट नावाने पूजा झाली असेल, तरी तिचे मूळ स्वरूप काय होते, हा प्रश्न पुरातत्त्व, इतिहास आणि शिल्पकलेच्या अभ्यासातून तपासता येतो. न्यायमूर्ती एन. आनंद वेंकटेश यांनी पुरातत्त्व विभागाच्या अहवालाच्या पार्श्वभूमीवर मूर्तीला 'थलावेट्टी मुनियप्पन' म्हणूनच ओळखणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका घेतली. मूर्तीचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तिचा ताबा हिंदू धार्मिक आणि धर्मादाय निधी विभागाऐवजी पुरातत्त्व विभागाकडे देण्याचे, बुद्ध म्हणून ओळख दर्शविणारा फलक लावण्याचे आणि मूर्तीवर पूजा अथवा धार्मिक विधी न करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे या प्रकरणातून समोर येते. या निर्णयावर कायदेशीर किंवा शास्त्रीय मतभेद असू शकतात. मात्र अशा मतभेदांचे निराकरण पुराव्यांच्या चिकित्सक परीक्षणातून झाले पाहिजे. पुरातत्त्वीय अहवाल चुकीचा वाटत असेल तर त्याचे शास्त्रीय खंडन करता येते. न्यायालयाचा निर्णय चुकीचा वाटत असेल तर अपील किंवा पुनर्विचारासारखे कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. परंतु पुराव्याऐवजी केवळ धार्मिक भावनेच्या आधारावर इतिहास ठरविणे ही वैज्ञानिक दृष्टी ठरणार नाही. भारतीय इतिहास हा विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवाहांच्या परस्परसंवादातून घडलेला आहे. बौद्ध, जैन, हिंदू आणि लोकपरंपरांमध्ये अनेक ठिकाणी सांस्कृतिक देवाणघेवाण झाली आहे. काळाच्या ओघात काही प्रतिमांची ओळख बदलली असण्याची शक्यता इतिहासाच्या अभ्यासात नाकारता येत नाही. त्यामुळे अशा स्थळांचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करणे गरजेचे आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी पुरातत्त्वज्ञ, इतिहासकार, शिल्पकला अभ्यासक आणि संबंधित समुदायांच्या सहभागातून प्राचीन मूर्ती व स्थळांचे संशोधन करावे. यामुळे प्रत्येक ऐतिहासिक प्रश्न धार्मिक संघर्षाचे कारण होण्यापेक्षा संशोधनाचा विषय बनेल. आज सोशल मीडियामुळे न्यायालयीन निर्णयांचे अर्धवट अर्थ वेगाने पसरतात. एका बाजूला 'हिंदू मंदिर बौद्ध झाले' असा प्रचार होऊ शकतो, तर दुसऱ्या बाजूला 'बुद्धांची स्थळे हिसकावली जात आहेत' असा दावा केला जाऊ शकतो. अशा टोकाच्या मांडण्या वास्तविक न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा समाजातील धार्मिक तणाव वाढवू शकतात. या प्रकरणाचा केंद्रबिंदू मात्र मूर्तीची ओळख निश्चित करण्यासाठी केलेली पुरातत्त्वीय तपासणी आणि त्यावर आधारित न्यायालयीन प्रक्रिया हा आहे. श्रद्धा वैयक्तिक असू शकते; इतिहास मात्र पुराव्यांवर तपासला जातो. त्यामुळे श्रद्धा जपा, पण सत्याला घाबरू नका. परंपरेचा सन्मान करा, पण पुराव्याला दाबू नका. न्यायालयीन निर्णयाशी असहमती असेल तर घटनात्मक आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करा. हीच लोकशाहीची शिस्त आहे. सेलमच्या त्या मूर्तीसमोर आज एक प्रश्न उभा आहे, ती बुद्धाची आहे की मुनियप्पनची? पुरातत्त्वीय पुराव्यांनी न्यायालयाला एक उत्तर दिले आहे. पण भारतीय लोकशाहीसमोर त्याहून मोठा प्रश्न उभा राहतो. आपण सत्य समोर आले तर ते स्वीकारण्याइतके प्रगल्भ आहोत का? या प्रश्नाचे उत्तरच आपल्या लोकशाहीच्या परिपक्वतेचे खरे मोजमाप ठरेल. म्हणून हा निर्णय केवळ एका मूर्तीच्या ओळखीचा निर्णय नाही. तर हा निर्णय आहे, पुराव्याचा विजय की पूर्वग्रहाचा? संविधानाचा आवाज की जमावाच्या भावनेचा? न्यायाचा मार्ग की धार्मिक राजकारणाचा? उत्तर आपणच ठरवायचे आहे. कारण बुद्ध असोत, मुनियप्पन असोत किंवा कोणत्याही श्रद्धेचे प्रतिक असो. सत्याला धर्म नसतो, न्यायाला जात नसते आणि संविधानाला बहुसंख्य-अल्पसंख्य असा भेद नसतो. याच मूल्यांवर लोकशाही उभी आहे. म्हणूनच न्यायपालिकेचे स्वातंत्र्य जपणे, न्यायालयीन प्रक्रियेवर विश्वास ठेवणे आणि पुराव्यावर आधारित निर्णयांचा सन्मान करणे ही कोणत्याही एका धर्माची बाजू नसून. ही भारतीय संविधानाची, भारतीय लोकशाहीची आणि सत्याच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका आहे.●●



प्रविण बागडे
9923620919

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## बजेटमधील वाटा व स्वतंत्र कायद्याच्या मागणीसाठी समता सैनिक दलाची बैठक



**नागपूर :** बजेटमध्ये योग्य वाटा मिळावा आणि या वाट्यासाठी स्वतंत्र कायदा तयार केला जावा, या मुख्य मागणीसाठी आज रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी संविधान चौक येथे समता सैनिक दलाची महत्त्वाची बैठक संपन्न झाली.
ही बैठक राष्ट्रीय संघटक प्रदीप गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला राष्ट्रीय महासचिव शेखर गायकवाड, तसेच मोर्चाचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी सांस्कृतिक भवन शोध केंद्र आंदोलनाचे नेतृत्व करणारे मार्शल नागसेन वच्छला शिवराम बडगे, उमेश गजभिये, अनिल गरडकर, रवि भगत आणि सिद्धार्थ कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.
बैठकीदरम्यान आगामी मोर्चाचे नियोजन आणि विविध भागांत प्रभाग कमिट्या गठीत करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.
यावेळी अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर विचारविनिमय करून विविध निर्णय घेण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्रदीप गायकवाड यांनी आगामी मोर्चा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर शताब्दी सांस्कृतिक भवन शोध केंद्राचे आंदोलन प्रभावीपणे कसे राबवायचे, याविषयी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

### शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा व किमान वेतनासह विविध मागण्यांसाठी आंदोलन

## आशा व गटप्रवर्तकांचा ६ ऑक्टोबरला गडकरींच्या निवासस्थानी मोर्चा



**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (CITU) नागपूर जिल्ह्याच्या वतीने गुरुदेव सेवाश्रम येथे सर्वसाधारण सभा घेण्यात आली. देशव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ६ ऑक्टोबर रोजी, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी मोर्चा काढून विविध मागण्यांचे निवेदन देण्याचा निर्णय सभेत एकमताने घेण्यात आला. आशा प्रवर्तकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन किमान वेतन, आशा योजनेला स्थायी मान्यता, कामगार कायद्यात समावेश, ग्रॅज्युटी, पेन्शन तसेच EPF व ESIC चा लाभ देण्याची प्रमुख मागणी आहे. मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास १ ते ३ डिसेंबर दरम्यान देशव्यापी महापडाव व संसद घेराव करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांनी दिला. यावेळी जिल्हा महासचिव कॉ. प्रीती मेश्राम यांच्यासह शेकडो आशा वर्कर उपस्थित होत्या. कार्यक्रमात डॉ. चंद्रशेखर बंदे यांनी कॅन्सरविषयी मार्गदर्शन केले तसेच आशा वर्करची मोफत कॅन्सर तपासणी करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाला उपस्थित रंजना पवनीकर, मंदा गंधारे, सरिता ठवरे, मनीषा रामटेके, सोनू सोनवणे, उज्वला कांबळे, प्रतिमा डोंगरे, भारती वानखेडे सह शेकडो आशा वर्कर उपस्थित होत्या.




सूर्यनमस्कार मंडळ आणि योगा मंडळ हनुमाननगर गार्डनमध्ये बहुजन सौरभ दैनिक पेपर घरों घरी वाचक बना अशी विनंती करतांना वाचक मंडळी.

## पाली भाषेचे अस्तित्व, अक्षर ओळख आणि शोध' विषयावर व्याख्यान




**मुंबई :** श्रावस्ती बुद्ध विहार सांस्कृतिक केंद्र समिती, मोतीलाल नगर क्रमांक-१, गोरेगाव (पश्चिम), मुंबई यांच्या वतीने वर्षावास मालिका २०२६ च्या ११व्या पुष्पात 'पाली भाषेचे अस्तित्व, अक्षर ओळख आणि शोध' या विषयावर व्याख्यान झाले. एकजूट लेणी अभ्यास प्रचार समूह (महाराष्ट्र राज्य) यांच्या अंतर्गत बबन आनंद ओव्हाळ (धम्मलिपी शिक्षक) यांनी व्याख्यान दिले. अनागारिक धम्मपाल यांच्या १६२व्या जयंतीनिमित्त सुरू असलेल्या 'पाली पखवाड्या'च्या उपस्थितांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. अरविंद सावंत यांनी एकजूट टीमच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. सीमा अतुल लाटकर (ज्येष्ठ लेणी संवर्धिका) यांचा संदीप कांबळे यांच्या हस्ते सत्कार करून सन्मानपत्र देण्यात आले. विहार समितीचे अध्यक्ष ॲड. शांताराम भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. संचालन राजकुमार अहिरे (सेक्रेटरी) यांनी केले, तर आभार डोळस यांनी मानले. एकजूट लेणी अभ्यास प्रचार समूहाचे सर्वेसर्वा सारिष डोळस (दादुस) यांच्यासह उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात कार्यक्रम झाला.

# महत्वाचे

## खा. प्रफुल पटेल यांनी नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेत केले समस्यांचे निराकरण



**गोंदिया :** खासदार प्रफुल पटेल यांनी आज रामनगर बगीचा येथील आपल्या निवासस्थानी कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच नागरिकांच्या भेटी घेत त्यांच्या विविध अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या. यावेळी पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ता व नागरिकांनी प्रशासकीय अडचणी तसेच जनहिताच्या प्रश्नांबाबत खा. प्रफुल पटेल यांच्याशी चर्चा केली. त्यांनी सर्वांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत आवश्यक त्या कार्यवाही करून समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना दिल्या. यावेळी खा. राजेंद्र जैन यांच्यासह जिल्ह्यातील वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संविधान सन्मान परिषद व काव्यसंमेलन २७ सप्टेंबरचा




**ठाणे :** संविधानाच्या ७५व्या वर्षानिमित साहित्य सेवा संस्था, बदलापूर यांच्या वतीने संविधान सन्मान परिषद व काव्यसंमेलन २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २.०० वा. कुळगाव-बदलापूर नगर परिषद सभागृह, कात्रप चौक, बदलापूर (पूर्व) येथे आयोजित करण्यात आली आहे. या संविधान सन्मान परिषदेचे मुख्य संयोजक बी.अनिल तथा अनिल भालेराव आहेत. या परिषदेचे उद्घाटन ॲड. डॉ. सुरेश माने हे करणार असून ते मार्गदर्शक म्हणून संबोधित करणार आहे. तर राजाराम पाटील हे प्रमुख वक्ते म्हणून विचार मांडणार आहेत. तर कुळगाव बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारोती गायकवाड हे प्रमुख अतिथी म्हणून यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तरी या परिषदेला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## देवमित्त अनागारिक धम्मपाल जयंती साजरी



**नागपूर :** संघमित्र बहुउद्देशीय विकास संस्थेच्यावतीने महान बौद्ध धम्मप्रचारक देवमित्त अनागारिक धम्मपाल यांची जयंती अनाथपिंडक बुद्ध विहार येथे उत्साहात व धम्ममय वातावरणात साजरी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरेश पानतावणे होते. प्रमुख वक्ते प्रा. आर.एस. बागडे यांनी अनागारिक धम्मपाल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत भारतभूमीत बुद्ध धम्माच्या पुनरुज्जीवनासाठी त्यांनी केलेल्या कार्याची तसेच महाबोधी महाविहार, बोधगया संदर्भातील ऐतिहासिक संघर्षाची माहिती दिली. अध्यक्षीय मार्गदर्शनात नरेश पानतावणे यांनी अनागारिक धम्मपाल यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन बुद्ध धम्माचा अभ्यास, आचरण व प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन केले. बुद्ध धम्म हा केवळ श्रद्धेचा विषय नसून मानवमुक्ती, समता, करुणा व प्रज्ञेचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. देविदास भांगे यांनी स्वलिखित कवितेतून अनागारिक धम्मपाल यांचा जीवनपट उलगडला. रमेश देशभ्रतार यांनीही मार्गदर्शन केले. संघमित्र बहुउद्देशीय विकास संस्थेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, धम्मप्रसार व समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमास उपासक-उपासिका, धम्मप्रेमी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व आभार प्रदर्शन अशोक जामगडे यांनी केले.

## आवळेबाबू चौकात पेरियार, प्रबोधनकार ठाकरे जयंती; भैय्यासाहेब आंबेडकर स्मृतीदिन




**नागपूर :** कर्मवीर आवळेबाबू परिसर चौक येथे १७ सप्टेंबर रोजी युथ फॉर रिव्होल्युशन ग्रुप आणि समूहघोष सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भंते अनागारिक, ई. व्ही. रामास्वामी पेरियार, प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त तसेच भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश बोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठी चित्रपट अभिनेत्री तक्षशिला वाघधरे, समता सैनिक दलाचे प्रदीप गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील आणि युथ फॉर रिव्होल्युशनचे जितेंद्र गायकवाड यांनी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अतुल देशभ्रतार, गजानन पानतावणे, मयुर गायकवाड, बाळुमामा, मनोहर गायकवाड, ईश्वर सूर्यवंशी, राजकुमार मेश्राम, अशोक नगरारे, भगवान गजभिये, संजय सोमकुवर, तिडके यांच्यासह नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन पानतावणे, संचालन अर्चना राऊत, तर आभार प्रदर्शन शालिनी मेश्राम यांनी केले.

## प्राचीन बौद्ध नगरी शूर्पारक-सोपाऱ्याचा अभ्यासपूर्ण इतिहास पुस्तकबद्ध



**भोईवाडा :** भारतातील प्राचीन बौद्ध नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शूर्पारक-सोपाराच्या इतिहासाचा संदर्भांसह अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे "शूर्पारक-सोपारा : भारतातील प्राचीन बौद्ध नगरी" हे पुस्तक लेखक डॉ. संतोष सखु देवजी सावंत यांनी लिहिले आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने डॉ. सावंत यांची आज भोईवाडा पंचायत समिती येथे भेट झाली. यावेळी "शूर्पारक–सोपारा" हे पुस्तक स्वीकारण्यात आले. त्याचप्रसंगी नथुराम जाधव लिखित 'महामाता रमाई' आणि 'एकजूट लेणी' ही धम्मलिपी पॉकेटबुक्स डॉ. संतोष सावंत यांना भेट देण्यात आली. शूर्पारक-सोपारा हे प्राचीन काळातील महत्त्वाचे व्यापारी व सांस्कृतिक केंद्र मानले जाते. बौद्ध धम्माच्या प्रसाराच्या इतिहासातही या प्रदेशाला महत्त्वाचे स्थान आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. सावंत यांनी पुस्तकातून शूर्पारक-सोपाऱ्याच्या प्राचीन इतिहासाचा विविध संदर्भांच्या आधारे अभ्यासपूर्ण मागोवा घेतला आहे. इतिहास, बौद्ध धम्म आणि पुरातत्त्वीय वारसा यांचा अभ्यास करणाऱ्या वाचकांसाठी हे पुस्तक महत्त्वाचे ठरणारे आहे. पुस्तकाची देवाणघेवाण आणि झालेली ही भेट धम्म व इतिहासविषयक साहित्याच्या माध्यमातून विचारांची देवाणघेवाण करणारी स्मरणीय आणि सुंदर भेट ठरली.




## महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या

**परभणी :** बिहारमधील बोधगया येथील महाबोधी महाविहारासाठी लागू असलेला बिहार टेम्पल ॲक्ट, १९४९ रद्द करून महाविहाराचा व्यवस्थापन ताबा बौद्ध समुदायाकडे द्यावा, अशी मागणी ऑल इंडिया बुद्धिस्ट फोरमतर्फे जिल्हाधिकारी कार्यालय, परभणीमार्फत राष्ट्रपतींना निवेदन देऊन केली.
अनागारिक धम्मपाल यांच्या १६२व्या जयंतीनिमित्त १७ सप्टेंबर रोजी त्यांच्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनातील कार्याला अभिवादन करण्यात आले. निवेदनात महाबोधी महाविहारासाठी बौद्ध धम्मातील व्यक्तींचा ट्रस्टमध्ये समावेश करून व्यवस्थापनाची जबाबदारी बौद्ध समुदायाकडे देण्याची मागणी केली. निवेदनावर इंजी. एम. एम. भरणे, गोपीनाथ कांबळे, आनंदा गरजे, संजय बगाटे, बी. पी. धबाले, दशरथ गायकवाड, धोंडीराज खेडकर, सुनील पवार, अशोक कांबळे, राजकुमार एंगडे, व्ही. व्ही. वाघमारे, एम. एम. बरे, गौतम पंडित, शिवाजी सुगंधे, नागसेन हत्तीअंबिरे, उत्तम रणवीर, भगवान वाघमारे, सुभाष मकरंद, सुरेश मस्के, रामराव जोंधळे, बालासाहेब कीर्तने, व्ही. एन. राक्षसे, रा. का. भारशंकर, श्याम मोरे, महेंद्र सानके, अनिल मस्के, संजय मुळे, मिलिंद पुंडगे, सुरेश प्रधान, नितीन टोंगराज, भीमराव वाघमारे, सुबोध कांबळे, रवी वावळे, विजय सावंत यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल व धम्म मैत्री संवाद अभियानाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पेरियार रामासामी जयंती उत्साहात साजरी

**छत्रपती संभाजीनगर :** दक्षिणेतील थोर समाजसुधारक पेरियार रामासामी यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पेरियार रामासामी यांच्या प्रतिमेसह शहरातील प्रमुख मार्गांवरून जयंती मिरवणूक काढण्यात आली. सामाजिक समता, स्वाभिमान, विवेकवाद आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या या मिरवणुकीत विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पैठण गेट, गुलमंडी मार्गे महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले चौक, औरंगपुरा येथे मिरवणुकीची सांगता झाली. मिरवणुकीत सहभागींच्या हातातील पेरियार रामासामी यांच्या तर्कवादी, समतावादी आणि परिवर्तनवादी विचारांचे संदेश देणारे फलक लक्षवेधी ठरले. पेरियार यांच्या विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचविण्यासाठी हँडबिल्सचे वाटप करण्यात आले.
मिरवणुकीदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि पेरियार रामासामी यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा जयघोष परिसरात दुमदुमून गेला. औरंगपुरा येथील महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समारोपप्रसंगी बोलताना पेरियार चळवळीचे अभ्यासक भीमराव सरवदे म्हणाले की, पेरियार रामासामी हे तर्कवादी, स्त्रीवादी व निरीश्वरवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांनी आयुष्यभर स्वाभिमान आणि सामाजिक समतेसाठी कठोर संघर्ष केला. जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांनी निर्भीडपणे आवाज उठविला. माणसाला माणूस म्हणून सन्मानाने जगता यावे, स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळावेत आणि समाजाची वाटचाल विवेक, विज्ञान व मानवतावादाच्या दिशेने व्हावी, यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यामुळे पेरियारांचे विचार आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात नव्याने समजून घेणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. या प्रसंगी प्राचार्य सुनील वाकेकर म्हणाले की, पेरियार यांची जयंती सर्वजनांसाठी समतावादी आणि स्वाभिमानी समाजव्यवस्थेच्या संकल्पनेशी जोडलेली आहे. पेरियार यांच्या विचारांचा समाजात व्यापक प्रसार व्हावा आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक गतिमान व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पेरियार यांच्या विचारांचा प्रसार आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ व्यापक करण्यासाठी विविध माध्यमांतून नवी दिशा मिळेल, असे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अरविंद खैरनार यांनीही मनोगत व्यक्त केले. पेरियार यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, शिक्षक, प्राध्यापक, संशोधक, महिला आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पेरियार यांच्या तर्कवादी आणि परिवर्तनवादी विचारांचा समाजमनावर प्रभाव निर्माण व्हावा, या उद्देशाने व्याख्याने, परिसंवाद, वक्तृत्व व निबंध स्पर्धा, जनजागृतीपर उपक्रम तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत, असे संयोजकांच्या वतीने जाहीर करण्यात आले. पेरियार रामासामी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून या कार्यक्रमासाठी माजी न्यायमूर्ती डी. आर. शेळके, प्राचार्य सुनील वाकेकर, कार्याध्यक्ष भीमराव सरवदे, उपाध्यक्ष दीक्षा पवार, अक्रम खान, प्रसिद्धीप्रमुख अमरदीप हिवराळे, प्रा. गुणरत्न सोनवणे, धन्यकुमार टिळक, सचिव मनिषा कुलकर्णी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी पुढाकार घेतला.




## भीमा कोरेगाव विजयस्तंभ जमीन प्रकरणी सरकारने अपील करावे



**नागपूर :** भीमा कोरेगाव विजयस्तंभ जमीन विभाग प्रकरणातील पुणे दिवाणी न्यायालयाच्या ११ सप्टेंबर २०२६ रोजीच्या निकालाला राज्य सरकारने तातडीने वरिष्ठ न्यायालयात आव्हान द्यावे, अशी मागणी बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीतर्फे ॲड. डॉ. सुरेश माने यांनी केली आहे. सन २०१७ पासून पुणे येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ श्रेणीसमोर रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ७८४/२०१७ प्रलंबित होता. या प्रकरणात न्यायालयाने मालवदकर परिवाराच्या वारसांना मालकी हक्क नव्हे, तर कब्जेदार व वहिवाटदार म्हणून मान्यता दिली असून त्यांच्या कब्जा हक्कास राज्य सरकार किंवा इतर कोणालाही अडथळा आणता येणार नसल्याचा मनाई आदेश दिला आहे. या निर्णयामुळे विजयस्तंभ परिसरातील अतिक्रमणे हटविणे व परिसराचे सुशोभीकरण करण्याच्या राज्य सरकार आणि बार्टीच्या प्रयत्नांना अडथळा निर्माण होऊ शकतो, असे ॲड. माने यांनी म्हटले. मात्र, न्यायमूर्ती अमोल शिंदे यांनी योग्य कायदेशीर प्रक्रिया व कायद्याचे पालन करून कारवाई करता येईल, असे नमूद केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे राज्य सरकार आणि बार्टीने तातडीने वरिष्ठ न्यायालयात दाद मागावी, अन्यथा हा निर्णय कायम राहण्याची शक्यता असल्याचे ॲड. सुरेश माने यांनी सांगितले. विजयस्तंभ परिसरातील मालवदकर परिवार मालक नसून कब्जेदार असल्याचा मुद्दाही त्यांनी अधोरेखित केला.

## धानोरीत डॉ. आंबेडकर व्याख्यानमालेचे सहावे पुष्प उत्साहात साजरे



**भैरवनगर, धानोरी :** चक्रवर्ती सम्राट अशोक संघ, भैरवनगर यांच्या वतीने आयोजित 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला'च्या चौदाव्या वर्षातील सहावे पुष्प उत्साहात व वैचारिक वातावरणात झाले. प्रमुख वक्ते डॉ. सुरेश कठाने यांनी 'सिद्धार्थ गौतमाचा जन्म ते परिव्रज्या' या विषयावर अभ्यासपूर्ण व प्रबोधनपर विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हरिश्चंद्र लोंढे होते. सिद्धार्थ भालेराव यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रणिता ठुनुकले यांनी केले, तर जितेंद्र कांबळे यांनी आभार मानले. लता भगवान कांबळे व परिवारातर्फे उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. परिसरातील उपासक, उपासिका, बालमित्र व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ भालेराव, उपाध्यक्ष चंद्रकांत जठार, डि. बी. भोसले, अरुण गोतारणे, जयंत नागले, संदीप वानखेडे, रामराव अडसुळे, रत्नाकर गायकवाड, रवींद्र पवार, संतोष खोब्रागडे, हरिश्चंद्र

## सत्यशोधक समाज स्थापना दिनानिमित्त निबंध स्पर्धा

**नागपूर :** महात्मा ज्योतिबा फुले यांनी २३ सप्टेंबर रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या स्थापना दिनानिमित्त इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ए.आय. तंत्रज्ञान काळाची गरज' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले निबंध २९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत पाठवावेत. निबंध हस्तलिखित अथवा टाईप करून पाठविता येईल. स्पर्धेतील उत्कृष्ट तीन निबंधांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकाचा पुरस्कार बौद्ध साहित्याचे अभ्यासक डॉ. प्रकाश खरात यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पाली भाषेचे प्रचारक दिवंगत सुधीर भगत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, तर तृतीय क्रमांकाचा पुरस्कार बौद्ध धम्माच्या प्रचारासाठी देश-विदेशात कार्य करणारे एन. बोधीरत्न महाथेरो यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी आपले निबंध स्पर्धेचे संयोजक भीमराव म्हैस्कर, मानव कल्याण अभ्यासिका, शताब्दी नगर, नागपूर-२७ यांच्या ९७६४४१०३६३ या भ्रमणध्वनी क्रमांकाच्या व्हॉट्सॲपवर पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिवोत्सव ऐतिहासिक धम्मभूमी देहूरोड येथे उत्साहात साजरा




**देहूरोड :** म. फुले यांनी सुरू केलेला शिवोत्सव ऐतिहासिक धम्मभूमी देहूरोड येथे उत्साहात साजरा झाला. मामुर्डी गाव ते ऐतिहासिक धम्मभूमी पर्यंत भव्य मिरवणूक काढून मुस्लिम, मराठा, माळी वाल्मिकी, व्यापारी आणि शीख बांधवांनी ठिकठिकाणी छ. शिवरायांच्या पुतळ्याचे भव्य स्वागत केले. त्यावेळी शिवोत्सवाचे महत्व आणि शिवानंदना घेण्यात आली. शिवोत्सवाचे उद्घाटन नगरसेवक पिंपरी चिंचवड धर्मपाल तंतरपाळे तर अध्यक्षपदी भीमपुत्र टेक्सास गायकवाड हे होते. पैगंबर शेख, सुधारणावादी विचारवंत यांनी मुख्य वक्ते होते. त्यांनी बौद्ध विहार चळवळीचे केंद्र होत असल्याचे अभिनंदन करून छ. शिवरायांचा खरा इतिहास लोकपर्यंत पोचल्याने शिवजयंती मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरी करत आहेत. त्यामुळे शिवाजी महाराज हे मुस्लिमविरोधी मांडणाऱ्या लोकांची अडचण झाल्याचे सांगितले. अकबराच्या चलनावर राम आणि सीतेचे चित्र होते, टिपू सुलतानच्या अंगठीवर राम लिहिलेले होते. शिवाजी महाराजाचा पोवाडा अमरशेख यांनी लिहिला तर अनेक मुस्लिम हे शिवाजी महाराज यांच्यासोबत असल्याचे अनेक पुरावे देऊन सांगितले. मंगलदास पडवेकर यांनी व्याख्यान केले. सुधाकर अभंग यांनी व्याख्यान दिले. कुमार आहेर यांनी मी गाडगेबाबा बोलतोय हे एकपात्री नाट्य सादर केले. प्रवीण कदम, संभाजी ब्रिगेड अध्यक्ष, प्रा. डॉ. सुधीर भालेराव आणि हाफिज अन्वर शेख यांनी व्याख्यान दिले. शिवोत्सवाचा समारोप प्रा. डॉ. संजय गव्हाळे यांच्या उपस्थितीत तर सुदामराम कांबळे, उपाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ, लक्ष्मण साळवे, डॉ. मिलिंद तायडे, हिरापुत्र भवार प्रमुख पाहुणे होते. प्रत्येक दिवशी शिवनंदना शिवोत्सवाचे अनुवर्तक व अध्यक्ष भीमपुत्र टेक्सास गायकवाड यांच्याद्वारा शिव वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाची भूमिका आणि प्रास्ताविक राहुल खांडेकर, सांस्कृतिक प्रमुख धम्मभूमी तर संचलन अशोक गायकवाड, सरचिटणीस, बुद्ध विहार कृती समिती तर आभार कोषाध्यक्ष बापूसाहेब गायकवाड यांनी मानले. शिवोत्सवाच्या यशस्वीतेसाठी अष्टप्रधान मंडळाचे अशोक गायकवाड, धर्मपाल तंतरपाळे, अरुण गायकवाड, बापूसाहेब गायकवाड, दीपक भालेराव, मीना गायकवाड, प्रवीण वाकोडे, संकेत जगताप तसेच शिवराज वाघमारे, अजय जगताप, भोला इंगळे, निनाजी हाताळकर, गौतम हातळकर, यमराज इंगळे इत्यादींनी परिश्रम केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648